म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे.
विषय ........
दा. क्र. ३२

BVBK-0400032

कि·

ना· वा·

नों· क्रं· ३२


म. शं. [illegible] ग्रंथ [illegible] शाला.

[illegible]

नं. 32

विषय किंकाळे ... ११ ..

कथाकल्पलता : : : १

# दिंडीरवन

पं. महादेवशास्त्री जोशी

BVBK-0400032

जोशी ब्रदर्स बुकसेलर्स ॲण्ड पब्लिशर्स
अप्पा बळवंत चौक, पुणे २

पाच रुपये

प्रकाशक :

केशव वामन जोशी
जोशी ब्रदर्स
२५ बुधवार पेठ,
अप्पा बळवंत चौक, पुणे २

अंतर्गत सजावट
भय्यासाहेब ओंकार

मुखपृष्ठ
दीनानाथ दलाल

मुद्रक :
सु. प. बर्वे
परशुराम प्रोसेस
१६ अ, शिवाजीनगर
पुणे ५

या पुस्तकास वापरलेला कागद सवलतीच्या दराने मिळालेला आहे. त्याबद्दल महाराष्ट्र राज्य कागद वाटप समितीचे आम्ही आभारी आहोत.

—प्रकाशक

## प्रथमारंभी

'दिंडीर वन' या पुस्तकानें मी एका नव्या कथामालेचा उपक्रम करीत आहे. ज्यांमध्यें कांहीं तरी सांस्कृतिक मूल्यें आहेत अथवा कोणत्या तरी सद्‌गुणाचा उत्कर्ष आहे, अशा पुराणें, लोकसाहित्य, प्रांतोप्रांतीं गायिल्या जाणाऱ्या वीर गाथा आणि भारतीय क्षेत्र-महात्म्य यांतून घेतलेल्या निवडक कथा, या मालेंतून प्रकाशित होतील. मुलांना कथांच्या द्वारें भारताच्या विविधरंगी आणि विश्व-व्यापी संस्कृतीचें दिग्दर्शन व्हावें, हा हेतु या मालेच्या मुळाशीं आहे. प्रस्तुत पुस्तकांतल्या सर्व गोष्टी भारतीय तीर्थक्षेत्रांच्या उत्पत्तिविषयीं आहेत.

मुखपृष्ठावरील चित्र श्री. दलाल यांचें असून आंतलीं रेषाचित्रें श्री. भय्यासाहेब ओंकार यांची आहेत. गोष्टींच्या मथळ्याची अक्षरें श्री. ग. वि. देशपांडे यांनीं काढलीं आहेत. या सर्वांचें मनःपूर्वक आभार.

पुणें,

माघ शुद्ध १५ शके १८७५ देवशास्त्री जोशी

## अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| १ | दिंडीर वन | .... | १ |
| २ | मनोहर पादुका | .... | १७ |
| ३ | तुकाई | .... | २९ |
| ४ | जक्कणाचार्य | .... | ३८ |
| ५ | भीमरथी | .... | ४९ |
| ६ | गौतमी गंगा | .... | ५८ |
| ७ | राजर्षि दिवोदास | .... | ६९ |

# दिंडीर वन



पंढरपूर हे महाराष्ट्रांतलें अग्रगण्य क्षेत्र. तें सोलापूर जिल्ह्यांत बार्शी लाइट रेल्वेवर आहे. भीमा नदी या क्षेत्रांतून वहाते. हिला या ठिकाणीं चंद्रभागा म्हणतात. हिच्या कांठावरच पुंडलिकाचें मंदिर आहे. पुंडलीक बाराव्या शतकांत झाला असें इतिहासकार सांगतात. याचें आधीं दर्शन घेऊन मग पांडुरंगाला भेटायचें. महाद्वारांतून आंत जातांना पहिली पायरी लागते तिला ' नामदेवाची पायरी ' म्हणतात. त्या ठिकाणीं नामदेवानें समाधि घेतली आहे. समोरच एक उथळसें कुंड आहे. तिथें चोखामेळ्याच्या अस्थी पुरलेल्या आहेत.

महाद्वारांतून आंत जातांच सभामंडप लागतो. तिथें गरुड हनुमंत उभे आहेत. पुढच्या मंडपाला ' सोळखांबी ' म्हणतात. तिथें एक विशिष्ट खांब आहे, त्याचें नांव गरुड–खांब. त्याला आधीं कवटाळायचें आणि मग शेजारच्या वाटोळ्या रंगशिळेवर गिरकी घेऊन नाचायचें. नंतर विठोबाचें दर्शन. त्याचे दोन्ही हात कटेवर आहेत. गळ्यांत कौस्तुभ, हृदयावर श्रीवत्सलांच्छन, कानांत मकरकुंडलें आणि मस्तकावर उभ्या टोपीच्या आकाराचा मुकुट असें त्याचें ध्यान आहे.

हें देऊळ श्री. पिंगळे नांवाच्या गृहस्थानें १५४० त बांधलें. इथें रखुमाई विठ्ठलाच्या शेजारीं नसून तिचें स्वतंत्र देऊळ कोपऱ्यांत आहे. जवळच गोपाळपुर नांवाचा एक भाग आहे. वारीच्या वेळी गोपाळकाला होतो तो या ठिकाणीं. आषाढी आणि कार्तिकी या दोन एकादश्यांना पंढरपुरांत लक्षावधि यात्रा जमते. पंढरीची वारी करणाऱ्यांना वारकरी म्हणतात. वारकरी हे विठ्ठलाचे भक्त आणि भागवतधर्माचे उपासक. त्यांना पंढरपूर म्हणजे पृथ्वीवरचें वैकुंठ वाटतें. ज्ञानेश्वर, एकनाथ, तुकाराम हे संतश्रेष्ठ म्हणजे भागवतधर्माचे आधारस्तंभ.

पुंडलिकाच्या भेटीसाठीं द्वारकचा श्रीहरी इथें आला, पुंडलिकानें त्याला इथें विटेवर उभें केलें आणि हें क्षेत्र निर्माण झालें. त्यापूर्वी याला दिंडीर वन म्हणत. पण द्वारकेचा देव इथें यायला आणखी एक महत्त्वाचें कारण घडलें होतें. तें कोणतें तें पुढील गोष्टीत वाचा.

● ● ●

श्रीकृष्ण गोकुळांतून गेला आणि सगळें गोकुळ शोकसागरांत बुडालें. नंदाचें घर उदास आणि ओकें झालें. यशोदेच्या डोळ्यांतलें पाणी खळेना. नंद वेड्यासारखा झाला. गाईवासरें चारा खाईनात. कृष्णाच्या मुरलीचे मंजुळ स्वर कुठून तरी येतात का, म्हणून तीं कान टवकारूं लागलीं. पेंद्या, लंब्या, इत्यादि कृष्णाचे बालसौंगडी सैरभैर झाले. गौळणी कामधाम विसरल्या. त्यांचें घरींदारीं कुठेंच चित्त लागेना. त्यांना आपल्या तान्ह्या-पारठ्यांचीसुद्धां माया उरली नाहीं. गोकुळभर जिकडे तिकडे उसासे आणि निसासेच ऐकूं येऊं लागले.

सर्वांत अधिक शोचनीय दशा झाली ती राधेची. कृष्णाच्या रूपानें जणुं तिच्या काळजांतला प्राणच निघून गेला होता. तिच्या देहाचें नुसतें काष्ठ उरलें. रडूं म्हणेल तर अतिदुःखानें तिच्या डोळ्यांतलें पाणीसुद्धां आटून गेलें. गोकुळांत कृष्ण आल्यापासू

तिचें भाग्य उदयाला आलें होतें. उगवणारा प्रत्यक दिवस तिला सणासारखा झाला होता. कृष्णाला शृंगारावें, नाचवावें, खेळवावें, यांत तिचा दिवस कसा चुटकीसारखा जात होता. यशोदेकडे हट्ट धरून खोड्या करणारा कृष्ण राधेकडे कसा सरळसूत होई. ती त्याला आपल्या घरीं घेऊन जाई. दहीभात भरवी, थोपटून निजवी, त्याचें सगळे कांहीं करी. कृष्णहि तिला अपार प्रेमसुख देई. तिच्या खोड्या काढी अन् विनविण्याहि करी. तिला तें सगळेंच गोड वाटे.



राधेला जळीं-स्थळीं कृष्ण दिसतो

पण अचानक एक दिवस कृष्ण निघून गेला आणि तिचें सर्व सुख हरपलें. तिचा दिवस सरतां सरेना. रात्र तर वैरीणच ठरली

तिच्या वांट्याला गोकुळ हें रान ठरलें. तिनें मग ठरविलें, कीं आतां गोकुळांत रहाण्यांत कांहीं राम नाहीं. नकोत हीं माणसें, नकोत गुरेवासरें कीं, नकोत कोणी ! ती मग एक दिवस उठली आणि कोणालाहि न कळवतां उत्तर दिशेला वाट चालूं लागली. तिनें सरळ हिमालय गांठला. तिथें एका शिखरावर बसून तिनें तप आरंभलें. कृष्णवियोगानें व्याकुळ झालेला जीव तिनें ध्यान-धारणेंत रमवला. पुढें पुढें तिला त्यांत आनंद वाटूं लागला. तिचा लाडका कृष्ण मग लहानशा सावळ्या मूर्तींतच राहिला नाहीं. जळीं, स्थळीं, काष्ठीं, पाषाणीं तिला तो दिसूं लागला. सगळें चराचरच कृष्णमय होऊन आपल्याला प्रेमसुख देत आहे, असें तिच्या अनुभवास येऊं लागलें.

अशा स्थितींत एक दिवस तिला साक्षात्कार झाला, कीं कृष्ण द्वारकेचा राजा झाला आहे अन् तो आपलें ऐश्वर्य पहाण्यासाठीं आपल्याला बोलावतो आहे. पूर्वीं जशी लहानग्या कृष्णाची मुरली कानीं पडली कीं ती कुंजवनांत धावत असे, तशीच ती आतांहि हिमाचल उतरून द्वारकेच्या मार्गानें धावूं लागली. ती दमली नाहीं कीं श्रमली नाहीं.

देवाची ती नवलाख पताकांनीं झळकणारी सोन्याची द्वारका पाहून तिला आनंदाचें भरतें आलें. ते मोठमोठे वाडे, त्या उंच उंच माड्या नि गच्च्या, त्या कमानी, तीं उद्यानें, तीं क्रीडासरोवरें आणि त्यांत रहाणारीं तीं आनंदी, हंसतमुख माणसें. हें सगळें पाहून तिचा हर्ष पोटांत मावेना. जिकडे तिकडे वाजणारीं सुरेल मंगलवाद्यें अन् सर्वांच्या मुखांतून निघणारीं श्रीकृष्णाचीं स्तुति-स्तोत्रें ऐकून तिच्या अंगावर सुखाचे रोमांच फुलले. ती मनांत म्हणाली कीं, ' माझ्या मुरलीवाल्या खोडकर कृष्णाचं हें वैभव ! '

ती राजवाड्याच्या दरवाजांत येतांच देवडीवरच्या छडीदाराकडून आंत वर्दी गेली. कृष्ण शेला सांवरीत लगबगीनें बाहेर आला. तिचें दर्शन होतांच त्याच्या मुखावर कोटिचंद्रांची प्रभा उल्हासली.

" राधे, तूं आलीस !" म्हणून एकदम भावनेच्या भरानें त्यानें तिचे तपश्चर्येनें देहाबरोबर कृश झालेले दोन्ही हात आपल्या हातांत घेतले.

" किती वाळलीस ग ! गोकुळांतली राधा ती तूच म्हणून सांगितलं तर कोणाला खरंसुद्धा वाटायचं नाहीं."

" अन् तूं तरी गोकुळांतला कृष्ण कुठें राहिला आहेस ?"

" नाहीं राहिलों तेंच बरं आहे. तुझीं किती तरी दुधाणीं फोडलीं असतील मीं. तुझी मथुरेची वाट कितीदा अडवली असेल, त्याला तर गणतीच नाहीं. फार छळलं, भंडावलं, मीं तुला."

" जागेपणींच कशाला, स्वप्नांतसुद्धां छळायचास मला तूं; पण तेंच गोड वाटायचं मला."

हसत, बोलत दालनांमागून दालने ओलांडीत ती कृष्णाच्या खास दिवाणखान्यांत गेली. कृष्ण आपल्या सुखासनावर बसला अन् त्याने आपल्या शेजारीं राधेला बसवून घेतलें. दोघें एकमेकांचें मुख न्याहाळूं लागलीं. दोघांच्याहि हृदयांत गतकाळच्या रम्य, मधुर स्मृती उचंबळून आल्या. मग राधा त्याला म्हणाली,

" केवढा थाटमाट केला आहेस रे !"

" आवडला तुला ?"

" माझ्या कृष्णाचं मला काय आवडणार नाहीं ? त्याचं सगळंच कांहीं न्यारं...बरं, तें राहूं दे. लग्नबिग्न केलंस का नाहीं ?"

" केलं आहे तर ! एक नव्हे राधे; सोळा सहस्र स्त्रिया आहेत मला."

" किती म्हणालास ?"

" अग सोळा सहस्र !"

" म्हणजे किती रे ?"

" अडाणीच आहेस वाटतं अजून. सोळा सहस्र म्हणजे खूप, खूप, खूप !"

" अग बाई ! भांडत बिडत नाहींत ना ?"



रुक्मिणी राधा-कृष्णांना पाहते

" भांडतात, रुसतात, फुगतात. सगळं कांहीं करतात."

" तें जाऊं दे ! जेवायला तरी वेळेवर वाढतात ना तुला ?"

"तीहि वानवाच आहे. म्हणूनच तर तुझ्या हातच्या दहीं-भाताची वारंवार आठवण येते." असें बोलून श्रीकृष्ण मन-मोकळे हंसला.

आणि त्याच्या त्या हास्याचा ध्वनी विरतो, न विरतो एवढ्यांत पट्टराणी रुक्मिणी दिवाणखान्यांत प्रविष्ट झाली. ती आली कीं सत्यभामा, कालिंदी, मित्रविंदा, जांबवती, कोणीहि दिवाणखान्यांत असो ; त्यांनीं उठून उभे रहायचें, तिचा पट्टराणीपदाचा मान संभाळायचा, असा तिथला प्रघात असे. पण राधा कांहीं उठली नाहीं. रुक्मिणीनें त्या नवख्या स्त्रीकडे भुवयांच्या धनुकल्या करून पाहिलें. तिला राधेचा राग आला, तो दोन कारणांनीं. एक ती उठली नाहीं म्हणून अन् दुसरें ती कृष्णाला खेटून त्याच्या सुखास-नावर बसली म्हणून. तिनें कृष्णाला फणकाऱ्यांतच विसरलें.

"कोण ही ?"

"अग, ही राधा." कृष्ण हसून म्हणाला.

"राधा ? असेल. मला तिच्या नांवाशीं कांहीं कर्तव्य नाहीं. ही तुमची कोण तें सांगा."

"आतां कसं सांगू तुला ? ही कोण म्हणून सांगू ? कुठलंहि नातं हिला लागू होत नाहीं. किंवा सगळींच लागू पडतात म्हण."

"असं उखाण्यानं बोलूं नका माझ्याशीं. स्पष्ट सांगा."

"स्पष्टच सांगू ? राधा म्हणजे माझं सर्वस्व आहे."

"अस्सं ! मग इतके दिवस हें सर्वस्व कोण्या देशाला होतं ?"

"होतं बिचारं रानावनांत. माझ्या नांवाची जपमाळ ओढीत." कृष्णानें हसून दोघींकडेहि दृष्टिक्षेप केला.

"कोण रे ही ? अन् तुला अशी कां तुसडेपणें बोलते ?" राधेनें कृष्णाला विचारलें.

"अग ही माझी पट्टराणी अन् विदर्भराजाची विनयवती कन्या."

रुक्मिणीला ती ओळख करून देण्याची पद्धत आवडली नाहीं. तिला वाटले, द्वारकेचा राणा आपला उपहास करीत आहे. ती ज्या दारानें आली, त्याच दारानें ओठांतल्या ओठांत कांहीं तरी पुटपुटत निघून गेली.

राधा एकदम तिथून उठली. तिला वाटलें, झालें हें बरें झालें नाहीं. रुक्मिणीला दोष देण्याच्या ऐवजीं ती स्वतःलाच बोल लावूं लागली. आपल्याला नगरांतले रीतिरिवाज कळत नाहीत, तेव्हां आपलंच कांहीं तरी चुकलं असलं पाहिजे. कृष्णानें तिची समजूत घालण्याचा पुष्कळ प्रयत्न केला. पण तिचें कमळ एकदां बावलें तें बावलेंच.

एवढ्यांत द्वारपालानें वर्दी आणली कीं, पट्टराणी आपल्या महालांत नाहींत. कृष्ण म्हणाला, तुळशीवृंदावनाच्या चौकांत असेल. तिथें नसली तर देवघरांत, नाहीं तर उद्यानांत, नाहीं तर कोशागारांत, वस्त्रागारांत, कुठेंतरी असेल. पण राजदूतांनीं आणि तिच्या आयाबायांनीं सगळीकडे शोध करूनहि तिचा पत्ता लागला नाहीं. आपण कुठनं द्वारकेला आलों असें राधेला वाटलें. ती कमालीची अस्वस्थ झाली. श्रीहरीच्या जिवालाहि अस्वस्थता वाटली. त्यानें कुंडिनपुराला तिच्या माहेरीं दूत पाठवले. पण तिथेंहि त्याची निराशाच झाली.

रुक्मिणी श्रीहरीची चैतन्यकळा. तीच एकाएकीं नाहींशीं झाल्यामुळें राजवाड्यांत आणि उभ्या द्वारकेंत औदासीन्य पसरलें. कृष्णाच्या इतर सर्व स्त्रियाहि कळाहीन झाल्या. जिकडे तिकडे रुक्मिणीच्या अदृश्य होण्याची चर्चा सुरू झाली. आतां द्वारकेचें काय होईल, म्हणून लोक चिंतातुर झाले. घरोघरींचे आनंदोत्सव थांबले.

उद्यानांतल्या क्रीडा बंद पडल्या. पशु पक्ष्यांच्या डोळ्यांत कारुण्य दिसूं लागलें. आजूबाजूचा सदा फळता-फुलता निसर्गहि कोमेजून गेला. वृक्षवल्लींचीं पानें-फुलें गळूं लागलीं. फळांतला रस आटून गेला. झरे, कालवे आणि कूप-तडाग खिन्न झाले.

रुक्मिणी आज येईल, उद्यां येईल, म्हणून कृष्ण कांहीं दिवस वाट पहात बसला. पण जसजसा एकेक दिवस लोटूं लागला, तस-तसा त्याला धीर निघेना. एवढी अमरपुरीसारखी सुंदर, समृद्ध, विलासवती द्वारका; पण कृष्णाच्या वांट्याला ती अरण्यासारखी झाली. दशदिशांना दूत पाठवूनहि तिचा कुठेंच पत्ता लागेना. तेव्हां कृष्णाला वाटलें कीं, 'रुक्मिणी म्हणजे परमात्म्याची चिच्छक्ति. तिनें लपायचें ठरवलें तर तिला कोण हुडकून काढील! केवळ आपल्यालाच ही गोष्ट शक्य आहे.

आणि मग द्वारकाधीश तिच्या शोधाथ स्वत: बाहेर पडला. रुक्मिणी नाहीं म्हणजे त्याला राजवैभव आणि राजोपचार काय करायचे होते ! तो गोकुळांत गेला आणि त्यानें सरळ मूळचें बालरूप धारण केलें आणि त्यावर गोपवेष चढवला. खांद्यावर काळी घोंगडी टाकली. डोक्यावर मोरपिसांचा मुकुट चढवला. गळ्यांत वन्य पुष्पांच्या माळा घातल्या. अधरावर मुरली ठेवली. यमुनेच्या तीरावर वृंदावनांतल्या कदंबवृक्षाखालीं देहुडाचरणीं उभें राहून त्यानें मुरलींत फुंकर भरली. तिच्यांतून निघणाऱ्या मंजुळ-मधुर स्वरमाला यमुनेच्या प्रवाहावर, वृक्षांच्या अग्रांवर आणि कुंजाकुंजांतून लहरूं लागल्या. गोकुळाच्या परिसरांत एकाएकीं चैतन्य भरलें आणि उल्हास संचरला. "आला रे आला. आमचा कृष्ण कन्हैया आला. आमचा 'गडी' आला. ही पहा त्याची मुरली वाजते आहे. ऐका, ऐका.... !"

लंगडचा, बोबडचा, पद्या, इत्यादि सगळे गोपाळ चहूं दिशांनीं धांवत, धापावत, हंसत, टाळचा पिटीत, देवाच्या भोंवतीं गोळा झाले. ते आले त्यांच्या पाठोपाठ ढवळ्या, तांबड्या, कपिला अशा सगळ्या गायीहि जमल्या. त्यांच्या मागून वासरेंहि बागडत-हुदडत आलीं. गायी, गोपाळ, वासरें यांचा त्या कदंबवृक्षाभोंवतीं सुंदर थाट मांडला. देवानें घटकाभर जीव लावून मुरली वाजवली. दिव्य राग–रागिण्या छेडल्या. गोपाळांच्या डोळ्यांतून आनंदाश्रूंची झरणी सुरू झाली. गायी-वासरें लुब्ध झालीं. यमुनेचें जळ पांगुळलें. पक्षी निश्चल झालें. कृष्णानें मुरली थांबवल्यावर बऱ्याच वेळानें सर्वांची समाधि उतरली. पेंद्या देवाला मिठी मारून म्हणाला.

" कृष्णा ! आनंद केलास ! तूं गोकुळांतून गेल्यापासून आम्ही जणूं निर्जीव झालों होतो. आज आम्हांला तूं पुन्हा जिवंत केलंस. चल. आतां आपण कवठं पाडायला जाऊं या. अन् तीं खाऊन मग यमुनेच्या वाळवंटांत चेंडूफळी. "

त्यावर कृष्ण गंभीरपणें त्यांना म्हणाला.

" गड्यांनो, मी गोकुळांत आलों, तुम्हांला भेटलों, तुम्ही आनंदित झालांत, हें सगळं खरं. पण तुमचा कृष्ण पूर्वींचा आनंदी कृष्ण नाहीं. तो आज दुःखी आहे "

" खरंच, खरंच ! तुझं तोंड बावलेलं दिसतं. आमच्या कृष्णगड्याला कसलं दुःख झालं आहे ! सांग आम्हांला. तुझ्या आधीं आम्ही उडी घेऊं. "

भावाचा भुकेला श्रीकृष्ण त्या गोपाळांच्या भाबड्या बोलांनीं अतरीं सुखावला. त्यानें म्हटलें.

" माझी पट्टराणी रुक्मिणी मजवर रुसून गेली आहे. कुठें गेली

आहे तिचा पत्ता नाहीं. म्हणून मी दु:खी आहें. मी तिच्या शोधासाठीं निघालों आहें. तुम्ही यालं माझ्याबरोबर ?"

'येतों, येतों' म्हणून सर्वांनीं एकच कोल्हाळ उठवला. देव त्यांना सांगातीं घेऊन दक्षिणेच्या मार्गाला लागला. गायी-वासरेंहि त्यांच्या पाठोपाठ चालूं लागलीं. आणि हा सर्व मेळावा रानेंवनें शोधूं लागला. खेडोपाडीं त्यांचा शोध सुरू झाला. रुक्मिणीचा शोध लागेपर्यंत थांबायचें नाहीं अन् परतायचें नाहीं, असा सर्वांनीं निर्धारच केला होता. होतां होतां ही यात्रा दिंडीर वनांत प्राप्त झाली.

तिथें पोंचतांच श्रीकृष्णाला कांहीं तरी निराळेंच वाटूं लागलें. त्याच्या चित्तवृत्ती एकाएकीं जुईच्या ताटव्यासारख्या बहरल्या. त्याला वाटलें कीं, इथलें वातावरण कांहीं वेगळेंच अनुभवाला येतें आहे. इथल्या तृणपर्णाच्या हिरव्या रंगावर कांहीं विशेष कांति खुलते आहे. इथलीं फुलें कांहीं आगळींच टवटवीत दिसत आहेत. हें वन कसल्या तरी अदृश्य अशा दैवी शक्तीनें भरून राहिलें आहे. इथल्या वाऱ्याची वहाणी जणूं चैतन्य पेरीत राहिली आहे. माझी रुक्मिणी इथें आली असेल काय? ती इथें आश्रमवासिनी झाली असेल काय ? तिच्याच आंसवानीं इथल्या वल्ली पल्लवीत झाल्या असतील. तिच्याच मुखाच्या सुगंधानें इथलीं फुलें सुवासिक झालीं असतील. तिच्याच अस्तित्वानें इथें असा आनंद खेळत असेल. होय. शक्य आहे. इथेंच आपण तिचा शोध केला पाहिजे.

त्यानें आपल्या गायी-गोपाळांना मुद्दाम मागें ठेवलें आणि तो एकटाच पुढें निघाला. इकडे तिकडे बारीक डोळ्यांनीं पहात पुढें जातां जातां लोहदंड तीर्थाजवळ त्याला एका स्त्रीची झुळूक दिसली तो उल्हासला. आणखी थोडा पुढें गेला. पहातो तों रुक्मिणी !

हरवलेलें निधान सांपडलें. परमात्म्याला त्याची शक्ति भेटली. 'विदर्भकन्ये ! ' म्हणून हांक मारावी, असें त्याच्या मनांत आलें. पण त्यानें मुखावाटे बाहेर पडूं पाहणारीं अक्षरें एकदम आवरलीं. कारण रुक्मिणी त्याची हांक ऐकण्याच्या मन:स्थितींत नव्हती.

एका शिलाखंडावर ती पद्मासन घालून बसली होती. तिचे डोळे मुकुलित झाले होते. ती स्तब्ध होती, शांत होती, बाह्य जगाला विसरून समाधिसुखांत निमग्न होती. तिचा सारा वेष वनवासिनीचा होता.

सभोंवती तुळशी वाढल्या होत्या. त्यांच्या मंजिऱ्या वाऱ्यावर डोलत होत्या. जणूं रुक्मिणीच्या सख्याच तिला वेढून राहिल्या आहेत. शेजारीं कमळांचें तळें होतें. वर वृक्षांची सांवली होती. डाव्या उजव्या हाताला पुष्पमंडित वेली वांकून आल्या होत्या आणि या सर्वांवर रुक्मिणीच्या मुखाचें चांदण्यासारखें तेज पसरलें होतें.

श्रीकृष्णाला तें दृश्य अतिमनोहर वाटलें. त्याला वाटलें, हिला हाक मारूंच नये, उठवूंच नये, मांडलेला देखावा मोडूंच नये. त्यानें आपली काठी दोन्ही मांड्यांत धरली आणि दोन्ही हात कटेवर ठेवून तो तसाच उभा राहिला. पहातां पहातां त्याच्या नेत्रांना टक लागले. घटका, दोन घटका अशा गेल्यावर मग मात्र त्याला राहवेना. त्यानें हळूच पण तिला ऐकू जाईल अशी हांक मारली.

" प्राणप्रिय विदर्भकन्ये "

ते शब्द रुक्मिणीच्या कानांतून मनांत शिरले. तिनें हळूच डोळ्यांचीं कवाडें उघडलीं. पहाते तों समोर एक गवळ्याचा पोरगा उभा आहे. अन् आपल्याला सलगीनें हांक मारीत आहे. लगेच तिच्या नाकपुड्या फुलल्या. नजर तिरकी झाली. कपाळ सुरकुतलें. तिनें तीव्र निषेधाच्या शब्दांत त्याला म्हटलें,

" कोण रे तूं फाजील ! दिसतोस मुलगा; पण चावटपणा बराच आहे अंगांत. एखाद्या पोक्त तपस्विनीला बायको म्हणून हांक मारायला लाज नाही वाटत? निर्लज्ज कुठला ! "

तिच्या या तिरसट बोलण्यानें कृष्णाला हसूं आवरेना. तो जसजसा हसू लागला, तसतशी रुक्मिणी अस्वस्थ होऊं लागली. या सांवळ्या चावट पोराला काय करावें, हें तिला समजेना. ' प्राणेश्वरी, अशी रागावूं नकोस ' असें तो वारंवार म्हणे अन् रुक्मिणीच्या अंगाची लाही लाही होई, शेवटीं ती चिडून म्हणाली,

" थांब ! येऊं देत द्वारकेचे राजे. येतीलच ते. त्यांना तुझं नांव सांगून तुला चांगली शिक्षा घडवतें. "

आणि हें कृष्णानें ऐकलें मात्र; तो खो खो हसूं लागला. आपल्या खोडकरपणाचें त्याला स्वतःलाच कौतुक वाटलें. रुक्मिणी उठून उभी राहिली अन् त्याच्यावर विजेसारखी कडकडली.

" जा जा ! चालता हो माझ्या डोळ्यांसमोरून. "

" जाऊं ? बघ हो ! मागाहून पस्तावशील. मग लागशील पायां पडायला ! गळ घालशील. विनवण्या करशील. मग मात्र परत येणार नाहीं. "

" मी कशाला मेल्या तुझ्या पायधरण्या करीन ! तू कोण माझा लागून गेला आहेस ! मला कोण समजलास तूं ! मी...मी... "

पण रुक्मिणीचे पुढचे शब्द तोंडांतल्या तोंडांतच घुटमळले. तिच्यापुढें शंखचक्रगदाधारी, श्रीवत्सलांच्छन मिरवणारी, चतुर्भुज, मेघश्याम मूर्ति उभी राहिली. रुक्मिणी एकदम खालीं पाहूं लागली. तिला सुखहि वाटलें अन् लाजहि वाटली. आपला स्वामी आपणाला शोधीत वनें दागें तुडवीत इथवर आला. हें पाहून त्याच्या अपार प्रेमाची तिला साक्ष पटली. तिला आपल्या अपराधीपणाची त्या

क्षणीं जाणीव झाली. तिनें देवाची भलतीच कसोटी पाहिली होती. यापुढें आणखी तिला छेडणें बरें नव्हे, असें वाटून देव अति हळुवार शब्दांत तिला म्हणाला,

" देवि, कशाला एवढे कष्ट घेतलेस ? तूं मला भक्तीनं जिंकलं आहेस म्हणून मी तुझा माग काढीत इथवर आलों. आतां तरी राग गेला ना ?"

रुक्मिणी मनांतून आनंदली; पण वरकरणीं रुसल्यासारखें करून म्हणाली,

" मुळींच गेला नाहीं राग. आलांत खरे; पण सरळ आलांत का ? तें काळंबेंद्रं गवळ्याच्या पोराचं सोंग कशाला आणलंत ?"

" तुला नाहीं ना आवडलं तें ?"

" मुळींच नाहीं आवडलं."

" रुक्मिणी, तें राधेचं आवडतं रूप आहे. राधेचा मुकुंद हा असा होता. एवढाच लहानगा होता. तो गोकुळांत दुधाणीं फोडीत होता. दह्या-दुधाचा काला करीत होता. गवळणींच्या खोड्या काढीत होता. आणि त्यांनीं गाऱ्हाणीं सांगितल्यावर यशोदेच्या हातचा मार खात होता. नेमकी त्या वेळीं राधा येत होती. माझीं आसवं आपल्या पदरानं पुशीत होती. मला कडेवर घेऊन घरीं नेत होती अन् थोपटून, गाणीं म्हणून निजवीत होती. तूं जर बारकाईनं माझं मुख पहाशील, तर अजून तिथें तिनं भरवलेल्या दहींभाताचा पांढरेपणा तुला दिसेल. राधा माझी कोण अन् ती माझ्या शेजारीं मला खेटून कां बसली, तें आतां तरी तुला कळलं का ?........" बोलतां बोलतां देव मोठा गंभीर झाला. त्याचे कमलनेत्र एका निराळ्याच दीप्तीनें प्रकाशूं लागले. तें पाहून रुक्मिणी सर्वांगीं विरघळली.

"कळलं, कळलं ! माझा भ्रम, मत्सर, विकल्प, सारं सारं मावळलं. मला आतां अधिक लाजवूं नका."

मग तिथें सुखाचें साम्राज्य पसरलें. रुक्मिणी देवाला म्हणाली, "चला आपण आतां द्वारकेला जाऊं." देव म्हणाला, "नाहीं, त्या आधीं आणखी एक काम आहे. एका भक्ताला भेट द्यायची आहे. त्याची तपश्चर्या आतां वरदानापर्यंत येऊन भिडली आहे. तें झालं कीं मग जाऊं. तोंवर तू इथेंच थांब."

आणि देव मोठ्या लगबगीनें पुंडलिकाकडे गेला. रुक्मिणीला प्रथम दाखविलें त्याच बाळरूपानें. पुंडलिक हा मोठा भक्त. त्याचे आईबाप वृद्ध झाले होते. त्यांनाच देव समजून तो मनोभावें आणि एकनिष्ठपणें त्यांची सेवा करीत होता. देव जाऊन त्याच्यापुढें उभा राहिला तेव्हां त्याचे हात मोकळे नव्हते. ते सेवेंत गुंतले होते. आल्या अतिथाला 'या' म्हणणें 'बसा' म्हणणें, हा सभ्य जनांचा धर्म. त्याला अनुसरून त्यानें जवळची एक वीट देवापुढें फेकली. देवाला तेवढा सत्कार पुरला. कारण तो भावाचा पाहुणा होता. तो त्या विटेवर उभा राहिला. कसा, तर दोन्ही पाय जोडून. दोन्ही हात कटेवर ठेवून. स्तब्ध आणि सुहास्यवदन.



पांडुरंग विटेवरी उभा

सेवाकर्म पुरें झाल्यावर पुंडलीक उठून देवाकडे गेला. त्याला तें समचरण, निळेंसावळें बाळध्यान मोठें गोड वाटलें. पहातां पहातां त्याचे डोळे प्रेमाश्रूंनीं भरले. त्याच्या डोळ्यांची धणी

पुरली. त्याला वाटलें, हें सुंदर ध्यान आपण पाहिलें, आपल्याला संतोष झाला, तसें तें पुढच्या अनंत पिढ्यांनाहि पाहायला मिळावें. भक्तांना, प्रेमळांना, बाळ्याभोळ्यांना हें आणि असेंच दर्शन अनंतकाळ घडावें.

पुंडलिकाच्या भक्तीला भुललेल्या देवानें जेव्हां त्याला 'वर माग' म्हटलें, तेव्हां तो बोलला,

"देवा, चक्रपाणि ! आता माझ्या दृष्टीपुढें आहेस तसाच चिरकाळ या ठिकाणीं उभा रहा. जे तुझ्या दर्शनाला येतील त्यांना भक्ति आणि मुक्ति दे. तुझीं अनंत नामं आहेत. पण इथें तूं विठ्ठल या नांवानें रहा. रुक्मिणीलाहि इथेंच राहूं दे. तुझे सगळे बाळ-गोपाळ इथेंच राहूं देत. हें भीमातीर म्हणजे दुसरी द्वारका होऊं दे ! कृपाळुवा सर्वेशा ! मला एवढं वरदान दे !

एकवार त्या पुंडलिकाकडे स्नेहाळ माउलीच्या दृष्टीनें पाहून देव बोलला,

"तथास्तु."

• • •

# मनोहर पादुका



नरसोबाची वाडी हें महाराष्ट्रांतलें प्रमुख दत्तक्षेत्र आहे. मिरजेवरून कोल्हापूरला जाणाऱ्या रेल्वेमार्गावर जयसिंगपूर नांवाचें एक स्टेशन लागतें. तिथून नरसोबाची वाडी नऊ मैल आहे. नरसिंह सरस्वती नांवाचे एक स्वामी पंधराव्या शतकांत होऊन गेले. ते दत्ताचे अवतार होते. त्यांनीं या ठिकाणीं वास्तव्य केल्यामुळें या स्थानाला महत्त्व आलें. इथें कृष्णा आणि पंचगंगा या दोन नद्यांचा संगम आहे. कृष्णेच्या तीरावर एक प्रशस्तसा घाट आहे आणि त्यावर तें दत्तपादुकांचें लहानसें मंदिर आहे. हा घाट एकनाथमहाराजांनीं बांधला असें सांगतात. इथें दर शनिवारीं पालखी निघते. यात्रा बहुधा नेहमींच असते. विशेषतः पिशाचबाधा झालेल्या लोकांना इथें आणून दत्ताच्या सेवेला लावतात. आश्विन कृष्णपक्षांत गुरुद्वादशीला इथें मोठा उत्सव होतो. इथल्या दत्तपादुकांना 'मनोहर पादुका' असें नांव आहे. पादुकांच्या वरच्या बाजूला पिंपळाच्या छायेंत रामचंद्रयोगी, नारायणस्वामी आणि मौनीस्वामी यांच्या समाधी आहे.

दत्तसंप्रदाय पुरातन आहे. अवतारमालिकेंत दत्ताला चौथें स्थान आहे. यानें योगबळावर धर्मस्थापना केली. 'गुरुचरित्र' हा त्रेपन्न अध्यायांचा

ओवीबद्ध थ दत्तसंप्रदायाचा मुख्य ग्रंथ आहे. तो वाचला कीं दत्तअवताराची सांगोपांग माहिती, मिळते.

नरसोबाची वाडी हें क्षत्र कसें निर्माण झालें त्याची मूळ कथा पुढें दिली आहे–

● ● ●

सहाशें वर्षांपूर्वीची ही गोष्ट आहे. कृष्णा आणि पंचगंगा यांचा जिथें संगम होतो, तिथें त्यावेळीं भयानक अरण्य होतें. नाना जातींचे वृक्ष उंच वाढले होते आणि घनदाट पसरले होते. त्यामुळें



श्रीनरसिंह सरस्वती

मध्यान्हींचा प्रतापसूर्यहि आपले किरण त्या भूमीवर पाडूं शकत नसे. तिथें मोडलिंब तर होतेच; पण जोडलिंबहि होते. वडपिंपळाच्या शेजारीं कवठवृक्षांनीं आपल्याला जागा मिळविली होती.

बलाच्या शेजारीं शमी वाढली होती. तिथल्या वेळूवनांत वारा गुंजत होता. वेताच्या वेली कृष्णेच्या पात्रावर वांकून जललहरींच्या खोड्या करीत होत्या. सुतारपक्षी कुठल्या तरी खोडावर टक्ऽटक् करायचा. पाठीवर तांबूस पंख असलेला भारद्वाज पक्षी प्रहराप्रहराला 'कुकुडऽकुम्' असा आवाज काढायचा. माकडें डहाळ्याडहाळ्यांना फळासारखीं लोंबकळायचीं. खारी चढायच्या नि उतरायच्या. दिवसा ससे आणि रात्रीं कोल्हे फिरायचे. अभाव होता तो फक्त माणसाचा. माणूस त्या रानांत पाय ठेवायला दचकत असे आणि तो प्रदेश शक्यतोंवर टाळीत असे.

पण भैरवभट्टाला मात्र त्याच रानांतून नेहमीं जावें लागे. तो भिक्षुक होता आणि शिरोळ गांवीं त्याची जोसपणाची वृत्ति होती. जीव मुठींत घेऊन कां होईना; पण तें रान ओलांडल्यावांचून त्याला गत्यंतर नव्हतें. सकाळीं शिरोळकडे जातांना आणि संध्याकाळीं तिकडून घरीं परततांना वाटेवरच्या या ठराविक दगडांची आणि झाडापेडांची भेट त्याला घ्यावीच लागे. वयाच्या पंधराव्या वर्षापासून तों आजमितीस पन्नाशी उलटून गेल्यावरहि त्याचा हा क्रम अव्याहत चालला होता. जीवनभर चाललेल्या या येरझारींत त्याला त्या रानांत माणसें भेटली होतीं तीं वाट चुकलेली आणि दिशा भुललेलीं. त्यांना त्यानें अनेकदां माणसांत नेऊन घातलें होतें आणि धन्यवाद मिळवले होते.

आजहि त्याला एक माणूस दिसला. कृष्णेच्या पैलतीरावरूनच त्यानें त्याला पाहिलें. पण तो मात्र चुकलेला वाटसरू आहे असें त्याला वाटलें नाहीं. कारण त्याच्या मुद्रेवर भयाचा, गोंधळल्याचा पुसटसुद्धा भाव नव्हता. तो कृष्णतीरच्या एका औदुंबराच्या तळवटीं सिद्धासन घालून बसलेला होता. दुरूनसुद्धा त्याचें दर्शन

प्रसन्न वाटत होतें. भैरवभट्टाला मोठेंच आश्चर्य वाटलें. हा कोण पुरुष, कुठून आला, कां आला, कां बसला, असा विचार करीतच नदी उतरून तो अलीकडे आला आणि त्या पुरुषाच्या जवळ जाऊन उभा राहिला.

शिखासूत्र नाहीं यावरून तो संन्यासी आहे हें भैरवभट्टान ओळखलें. संन्याशाचीं इतरही सर्व लक्षणें त्याच्या ठिकाणीं होतीच. अंगावर काषाय वस्त्रें होतीं. गळ्यांत रुद्राक्ष शोभत होते. दंड-कमंडलू जवळच ठेवलेले होते. मुखावर वैराग्य ओसंडत होतें. तप आणि योग यांचें तेज प्रत्येक अवयवांतून निहाळत होतें. त्याच्या दर्शनानें भैरवभट्टाचा भक्तिभाव जागृत झाला. त्यानें त्या यतिवर्या-पुढें साष्टांग नमस्कार घातला. यतिवर्यानें 'नारायण' म्हणून आशीर्वाद उच्चारला. आपण कोण, कुठले हें त्याला विचारण्याचें भैरवभट्टाला धैर्यच झालें नाहीं. कोणीच कोणाला कांहीं पुसलें नाहीं, विचारलें नाहीं. मग भैरवभट्ट त्याचेंच चिंतन करीत शिरो-ळ्याकडे निघून गेला. संध्याकाळीं परत येतांना पहातो तर पुनश्च तेंच दृश्य. तेंच कृष्णातीर. तोच औदुंबर आणि त्याखालीं ध्यान-मग्न बसलेली तीच यतिमूर्ति. भैरवभट्टानें पुन्हा एक नमस्कार केला आणि तो सूर्यास्तापूर्वीं आपल्या घरीं पोंचला. रात्रीं त्यानें घडला वृत्तांत आपल्या भार्येला सांगितला. दोघांनीं मिळून त्या घटनेवर चर्चा केली. आणि कोणी तरी महान् सत्पुरुष आहे यांत शंका नाहीं, असा निर्णय करून तीं झोंपी गेलीं.

भैरवभट्टाला रोज जातां येतां त्या सत्पुरुषाचें दर्शन घडूं लागलें. ज्या दिवशीं त्याला शिरोळला जायचें नसेल, त्या दिवशींच फक्त त्याचें दर्शन अंतरे आणि मग त्याला दिवसभर त्या गोष्टीची चुटपुट लागून राही. मग रात्रीं स्वप्नांत तरी तो त्याचें

दर्शन घेई आणि सकाळीं तो स्वप्नसाक्षात्कार आपल्या गृहिणीला मोठ्या उल्हासानें सांगे. त्याला स्वामींचें वेड लागलें होतें. तो त्यांच्या दर्शनावरच संतुष्ट होता. घरांत दारिद्र्य होतें. निर्वाह जेमतेम चालत होता. पण तरीहि भैरवभट्टाला स्वामींकडून कांहीं तरी मागून घ्यावें असें कधींच वाटलें नाहीं. त्याला मूलबाळ नव्हतें. पण 'स्वामी मला पुत्र द्या' हे शब्दसुद्धा कधीं त्यानें त्यांच्यापुढे उच्चारले नाहींत. त्याच्या घरांत गृह्याग्नि होता. भार्या सच्छील आणि प्रेमळ होती आणि पतीच्या सुखांत आपलें सुख मानून त्याला प्रसन्न ठेवायला झटणारी होती. गरीब असूनहि अतिथीचा सत्कार करतांना त्यानें कधीं हात आंखडला नाहीं. घरांतलें हव्यकाव्य कधीं सोडलें नाहीं. जें ईश्वरानें दिलें तेवढ्यांत संतोष मानून ईश्वरचिंतनांत निमग्न असणारें असें तें जोडपें होतें.

अशीं बारा वर्षें गेलीं. स्वामी त्या स्थळाहून कधीं हालले नाहींत. ज्या औदुंबरातळीं ते बसत होते तो वृक्ष त्या बारा वर्षांत अंगानें वाढला आणि शाखांनीं पसरला. पण स्वामींच्या देहांत आणि चर्येत लवमात्रसुद्धा फरक झाला आहे असें त्याला दिसलें नाहीं. समोरच्या कृष्णेच्या पात्रांत कुठें डोह झाले; तर कुठें वाळूचे ढीग फुंगले. आजूबाजूच्या निसर्गांतहि बदल झाला. पण स्वामींची मुद्रा मात्र ती आणि तशीच. जणुं कालच आले आहेत आणि कालच त्यांना पाहिले आहे.

त्या बारा वर्षांत आणखीहि एक मोठा बदल झाला होता. स्वामींची कीर्ति सभोंवतीं कित्येक कोसांवर पसरली होती. भाविक, पीडित, रंजले-गांजले, संसारी-परमार्थी असे अनेक स्त्री-पुरुष चारी वाटांनीं त्यांच्या दर्शनाला येऊं लागले होते. स्वामी अनेकांना उपदेश करीत होते. चुकलेल्यांना सन्मार्गाला लावीत होते

आणि आपद्ग्रस्तांना धीर देत होते. ज्या रानांत पाय ठेवायला पूर्वी माणसाच्या काळजांत दचक भरें, तेंच रान आणि तोच कृष्णा-पंचगंगा संगम आतां माणसांनीं फुलूं लागला होता. एक नवें क्षेत्र, नवें विश्रांतिस्थान निर्माण झालें होतें. आणि हें सगळें त्या स्वामीमहाराजांच्यामुळें.

स्वामींच्या कृपेमुळें अनेकांना अनेक प्रकारचे लाभ झाले; पण भैरवभट्टाचें भाग्य उजळायला मात्र बारा वर्षें जावीं लागलीं. एक दिवस संध्याकाळीं घरीं जात असतां तो नित्याप्रमाणें स्वामींच्या दर्शनाला गेला. स्वामी त्या दिवशीं त्याच्याशीं बोलले. जवळ बसवून त्याची सगळी चौकशी केल्यावर 'आजची रात्र इथें रहा' म्हणून त्यांनीं त्याला आज्ञा केली. भैरवभट्टाला एकापरी आनंद झाला अन् दुसऱ्यापरी सकट वाटलें. बायको घरीं एकटीच असल्या-मुळें त्याला वस्तीला घरीं जाणें भाग होतें. त्यामुळें तो चुळबुळ करूं लागला. स्वामींना त्याची नाखुषी कळली. त्यांनीं कारण विचारलें. भैरवभट्टानें मनांतला भाव त्यांना सरळ सांगितला. त्यावर स्वामी बोलले कीं, " ईश्वराला तुझ्या भार्येची चिंता आहे; तूं निश्चिंत रहा ! "

भैरवभट्टाला पुढें कांहीं बोलतां येईना. मन घट्ट करून तो तिथें राहिला. मग कृष्णेच्या पात्रांत सायंसंध्या करून तो स्वामींच्या पुढें येऊन बसला. स्वामीहि ध्यानधारणा करून मोकळे झाले आणि त्याच्याशीं बोलूं लागले.

" या स्थळीं येऊन मला बारा वर्षें झालीं. एकांतवासांत तप करावें म्हणून हें अरण्य पत्करलं होतं. पण इथेंहि उपाधी वाढल्या. आतां इथून कुठें तरी दूर जावें म्हणतों. पण त्या आधीं या संग-मावर मी दत्तमहाराजाच्या 'मनोहर पादुका' स्थापन करणार

आहे. मला महाराजांची तशी आज्ञा झाली आहे. पण पादुकांची केवळ स्थापना केली म्हणून भागलं नाहीं. त्यांच्या नित्यपूजेची व्यवस्था व्हायला हवी. तूं सच्छील ब्राह्मण आहेस. तुझ्या अंतरांत भक्तिभाव आहे. म्हणून तूं इथला पुजारी व्हावस, अशी माझी इच्छा आहे."

स्वामींचें हें भाषण ऐकून भैरवभट्ट आश्चर्यांत पडला. त्याला भयहि वाटलें. स्वामी सांगत होते तें काम सोपे नव्हतें. त्याला झेपण्याजोगें नव्हतें. कांहीं क्षण विचारांत घालवून तो नम्र वाणीनें बोलूं लागला,

"गुरुमहाराज, स्पष्ट बोलतों याची क्षमा असावी. हें किर्र रान ! इथें कसलीहि सोय नाहीं कीं कुणाचा शेजार नाहीं. मी एकटा बायकोला घेऊन इथें कसा राहूं ? त्रिकाळपूजा करायची म्हणजे बाहेर जाणं खुंटलं. निर्वाह कसा चालायचा ? शिवाय आम्हां दोघांचंहि आतां उतारवय झालं आहे. तशांत पोटीं संतान नाहीं. आम्हीं पिकलीं पानं झडलों कीं, पुढें पूजा कुणी चालवायची ? स्वामी, आज्ञा मोडवत नाहीं; पण रुकारहि देववत नाहीं. माझं मन गोंधळलं आहे. मी उद्यां घरीं जातों. बायकोचा विचार घेतों आणि उभयतांच्या मतानं जें ठरेल तें आपल्या चरणांजवळ येऊन सांगतों."

"ठीक आहे" स्वामी म्हणाले. मग त्याला झोंपण्याची अनुज्ञा देऊन आपणहि झोंपी गेले. भैरवभट्ट पडशी उशाला घेऊन आडवा पडला खरा; पण त्याला कांहीं केल्या झोंप येईना. स्वामींची आज्ञा आणि घरीं बायको तळमळत असेल ही काळजी. या दोन्हीं गोष्टींमुळें त्याची झोंप उडाली.

त्याची पत्नी खरोखरच चिंताग्रस्त झाली होती. तिनें देवाशीं

दिवा लावला. गृह्याग्नीला समिधा दिली. मग गाईची धार काढली. एवढ्यांत अंधार पडला. पण तरीहि भैरवभट्ट घरीं परतला नाहीं. त्यामुळें तिला काळजी उत्पन्न झाली. बाहेर थांबवेना आणि घरांत लक्ष लागेना, अशी तिची अवस्था झाली. प्रहर रात्र उलटली, तरी नवऱ्याचें पाऊल वाजलें नाहीं अनेक शंकाकुशंकांनीं तिला घेरलें. तिच्या डोळ्यांतून घळघळ पाणी वाहूं लागलें. एकवीरा ही तिची कुलदेवता. ती तिच्यापुढें नाक घासून तिला विनवूं लागली. 'हे महामाये, तूंच माझी माउली. माझं कुंकू सुरक्षित घरीं येऊं दे.' बसवेना म्हणून ती मग आडवी झाली. पण तिला तरी झोंप कोठून येणार! तळमळनच तिनें ती रात्र घालवली.

अरुणोदयाला उठून तिनें सडासंमार्जन केलें. सगळें गृहकार्य झटपट उरकलें. प्रातःस्नान करून अग्नीला आहुति दिली. तरीहि भैरवभट्ट आला नाहीं मग मात्र तिला घरांत रहावेना ती त्याच्या शोधासाठीं घराबाहेर पडली आणि सरळ शिरोळच्या रस्त्याला लागली पण तिला फार चालावें लागलें नाहीं. थोड्याच अंतरावर भैरवभट्ट तिला येतांना दिसला उभयतांची भेट झाली. तिचा जीव भांड्यांत पडला दोघेंहि मग घरीं आलीं. भैरवभट्टानें रात्रीं आपण स्वामींच्या आज्ञेनें त्यांच्या सन्निध राहिलों, असें तिला सांगितलें मग ती लगेच स्वयंपाकाला लागली भैरवभट्ट स्नान करून देवपूजेला बसला. नैवेद्य, वैश्वदेव करून काकबळि टाकायला बाहेर जातों, तों दारीं एक जटाधारी अतिथि उभा. भैरवभट्टानें त्याला आदरानें घरांत आणलें आणि पाय धुवायला पाणी देऊन आपल्या पंक्तीला जेवायला बसवलें. अतिथि स्वस्थपणें जेवूं लागला. गृहिणी त्याला आग्रहानें वाढूं लागली.

हा जटाधारी कोण बरें होता? दुसरा कोण असणार! कृष्णातीरींचा सिद्धयोगीच निराळें रूप घेऊन भैरवभट्टाच्या घरीं आला होता. त्या रूपानें त्याला भैरवभट्टाच्या सर्व आशंका फेडायच्या होत्या, अतिथीची शांत आणि प्रसन्न मुद्रा पाहून भैरवभट्टाला त्याच्याबद्दल आदर वाटला अन् विश्वासहि वाटला. भोजन झाल्या-

वर रात्रीं घडलेली सर्व हकीगत त्यानें अतिथीला सांगितली. स्वामींची इच्छाहि निवेदन केली. आणि या बावतींत शेवटीं 'तुम्हीच मला योग्य ती सल्ला ती द्या' अशी विनतीहि केली.



त्रिगुणात्मक त्रैमूर्ति

तो जटाधारी अतिथि क्षणभर थांबून त्या दोघांना म्हणाला,

"भैरवभट्ट, तुझं भाग्य उजळलं, दत्तगुरूची तुझ्या वर कृपा झाली. कृष्णातीरीं औदुंबराच्या तळीं बसलेला तो सिद्धयति कोण आहे हें तुला ठाऊक आहे ? तो श्रीपाद श्रीवल्लभानंतरचा दत्तात्रेयाचा अवतार आहे भैरवभट्ट. बैस. बाई, तूहि बैस मी तुम्हांला त्याची गोष्ट मुळापासून सागतों." असें म्हणून त्या अतिथीनें गोष्ट सांगायला प्रारभ केला.

"विदर्भ देशांत कारंजपुरीं एक ब्राह्मण राहात होता. त्याचें नांव माधव आणि त्याच्या पत्नीचें अंबिका. दोघेंहि सत्त्वशील, ईश्वरभक्त या उभयतांच्या पोटीं एक मुलगा जन्माला आला. उपजतांच त्यानें ॐकाराचा उच्चार केला. सर्वांना नवल वाटलें. मुलगा दिशींमाशीं वाढूं लागला, रांगूं लागला, चालूं लागला, पण बोलणें मात्र उमटलें नाहीं. कोणी कांही विचारलें तर तो नसतें ॐ म्हण आणि स्तब्ध राही. लोक 'मुका, मुका' म्हणून त्याची चेष्टा करूं लागले. आईबापांना तें ऐकून दुःख होई; पण करतील काय ? अंबिकेनें शिवाची आराधना, शनिप्रदोष वगैरे देवधर्म केला; पण कांहींच फळ आलें नाहीं. मुलगा खुणा करूं लागला, नुसतेंच ॐ ॐ म्हणूं लागला कीं आईच्या डोळ्यांत पाणी उभें राही. अशीच एक दिवस ती अश्रू गाळीत बसली असतांना मुलानें

तिचे डोळे पुसले आणि 'आपली मुंज कर' असें खुणेनेंच तिला सांगितलें. तिनें ती गोष्ट नवऱ्याला सांगितली. मुंज करून तरी कांहीं सुधारणा होते का पहावी, म्हणून आईबापांनीं मुंजीची तयारी चालवली. एका सुमुहूर्तावर त्याचा व्रतबंध झाला. आई वात्सल्यभरानें त्याला भिक्षावळ घालायला आली.

आणि काय आश्चर्य सांगावें! मुलगा 'ॐ भवती' म्हणून घडाघड चारी वेदांचे मंत्र म्हणूं लागला. आईबापांचा हर्ष पोटांत मावेनासा झाला. सर्व लोक आश्चर्य करूं लागले. हा कुणी तरी ईश्वराचा अवतार आहे, म्हणून गांवांतले लोक त्याच्या दर्शनाला येऊं लागले आणि त्याच्यापुढें लोटांगणा घालूं लागले. आईबापांची मनोव्यथा तर धुऊन निघालीच. शिवाय अशा अलौकिक पुरुषाला जन्म दिल्याबद्दल त्यांना धन्यताहि वाटली.

पण हा आनंद त्यांना फार काळ उपभोगतां आला नाहीं. पुत्रानें संन्यास घेण्याची इच्छा प्रदर्शित करून काशीला जाण्याची परवानगी मागितली. आईबापांचा जीव कासावीस झाला. तीं कळवळथानें त्याचें मन वळवूं लागलीं. पण मुलाचा निर्धार अभंग राहिला. त्यानें आईबापांना कांहीं तत्त्वज्ञानाच्या गोष्टी सांगितल्या. कसेंबसें त्यांचें समाधान केलें आणि अखेर त्यांचा निरोप घेतला.

तो घरून निघाला तो सरळ काशीक्षेत्रीं आला. त्यानें कांहीं काळ गंगेच्या कांठीं तप केलें. मग संन्यास घेतला आणि 'नरसिंहसरस्वती' असें चतुर्थाश्रमांतलें नांव धारण केलें.

स्वामी तिथून हिमालयाच्या यात्रेला निघाले. नारायणाचें दर्शन करून ते मानससरोवराला गेले. पुन्हा खालीं उतरून गंगातीराचीं सगळीं क्षेत्रें हिंडले. नंतर नाशिक, त्र्यंबकेश्वर करून कांहीं काळ औदुंबरीं राहिले. आणि त्यानंतर आज गेलीं बारा वर्षं ते कृष्णा-पंचगंगा संगमावर वास्तव्य करून आहेत. भक्तांच्या मनकामना पूर्ण करणें, अधर्माचा उच्छेद करून सद्धर्म वाढवणें, हें त्यांचें अवतारकार्य आहे. गेलीं बारा वर्षं तूं त्यांचें चरित्र पहातोसच आहेस. तेव्हां तूं त्यांची आज्ञा शिरसावंद्य मान. शंका

धरूं नको. अनमान करूं नको. तुझें कल्याण होईल !"

जटाधारी अतिथि ही गोष्ट सांगून भैरवभट्टाच्या घरांतून निघून गेला. दोघांचींहि अंतःकरणें आनंदानें भरून आलीं. आणि पुनश्च स्वामींना कधीं भेटतों असें त्यांना झाले. दुसऱ्या दिवशीं सकाळीं तीं दोघेंहि स्वामींच्या दर्शनाला निघालीं. भैरवभट्टाच्या पत्नीनें पिठामिठासह सगळी भोजनसामग्री बरोबर घेतली. त्यांनीं प्रथम कृष्णेंत स्नान केलें आणि मग स्वामीचें दर्शन घेतलें. भैरवभट्ट स्वामींना म्हणाला.

" महाराज, आपण कोण हें कालपर्यंत मला ठाऊक नव्हतें. काल एका अतिथीनें आमचें अज्ञान दूर केलें. आम्ही आपल्याला शरण आहोंत. आपल्या आज्ञेप्रमाणें आम्हीं वागूं. आमच्यावर अखंड कृपा असूं द्यावी. "



मनोहर पादुकांची पूजा

स्वामींच्या मुखावर प्रसन्न हास्य झळकलें. ज्या 'मनोहर पादुका' स्वामींना तिथें स्थापायच्या होत्या. त्यांची विधियुक्त पूजा स्वामींनीं भैरवभट्टाकडून करवून घेतली. भैरवभट्टाच्या बायकोनें पुरणावरणाचा स्वयंपाक केला. भैरवभट्टानें पादुकांना महानैवेद्य दाखवला. नंतर स्वामींना पुडी दिली. मग दोघांनीं महाप्रसाद ग्रहण केला स्वामी त्यांच्यावर तुष्टले. त्यांच्याच आग्रहासाठीं तीन महिने त्या ठिकाणीं राहिले. पुढें आश्विन वद्य द्वादशी

तिचे डोळे पुसले आणि 'आपली मुंज कर' असें म्हणेनेंच तिला सांगितलें. तिनें ती गोष्ट नवऱ्याला सांगितली. मुंज करून तरी कांहीं सुधारणा होते का पहावी, म्हणून आईबापांनीं मुंजीची तयारी चालवली. एका सुमुहूर्तावर त्याचा व्रतबंध झाला. आई वात्सल्यभरानें त्याला भिक्षावळ घालायला आली.

आणि काय आश्चर्य सांगावें! मुलगा 'ॐ भवती' म्हणून घडाघड चारी वेदांचे मंत्र म्हणूं लागला. आईबापांचा हर्ष पोटांत मावेनासा झाला. सर्व लोक आश्चर्य करूं लागले. हा कुणी तरी ईश्वराचा अवतार आहे, म्हणून गांवांतले लोक त्याच्या दर्शनाला येऊं लागले आणि त्याच्यापुढें लोटांगणा घालूं लागले. आईबापांची मनोव्यथा तर धुऊन निघालीच. शिवाय अशा अलौकिक पुरुषाला जन्म दिल्याबद्दल त्यांना धन्यताहि वाटली.

पण हा आनंद त्यांना फार काळ उपभोगतां आला नाहीं. पुत्रानें संन्यास घेण्याची इच्छा प्रदर्शित करून काशीला जाण्याची परवानगी मागितली. आईबापांचा जीव कासावीस झाला. तीं कळवळ्यानें त्याचें मन वळवूं लागलीं. पण मुलाचा निर्धार अभंग राहिला. त्यानें आईबापांना कांहीं तत्त्वज्ञानाच्या गोष्टी सांगितल्या. कसेंबसें त्यांचें समाधान केलें आणि अखेर त्यांचा निरोप घेतला.

तो घरून निघाला तो सरळ काशीक्षेत्रीं आला. त्यानें कांहीं काळ गंगेच्या कांठीं तप केलें. मग संन्यास घेतला आणि 'नरसिंहसरस्वती' असें चतुर्थाश्रमांतलें नांव धारण केलें.

स्वामी तिथून हिमालयाच्या यात्रेला निघाले. नारायणाचें दर्शन करून ते मानससरोवराला गेले. पुन्हा खालीं उतरून गंगातीराचीं सगळीं क्षेत्रें हिंडले. नंतर नाशिक, त्र्यंबकेश्वर करून कांहीं काळ औदुंबरीं राहिले. आणि त्यानंतर आज गेलीं बारा वर्षें ते कृष्णा-पंचगंगा संगमावर वास्तव्य करून आहेत. भक्तांच्या मनकामना पूर्ण करणें, अधर्माचा उच्छेद करून सद्धर्म वाढवणें, हें त्यांचें अवतारकार्य आहे. गेलीं बारा वर्षें तूं त्यांचें चरित्र पहातोसच आहेस. तेव्हां तूं त्यांची आज्ञा शिरसावंद्य मान. शंका

धरूं नको. अनमान करूं नको. तुझें कल्याण होईल !"

जटाधारी अतिथि ही गोष्ट सांगून भैरवभट्टाच्या घरांतून निघून गेला. दोघांचीहि अंत:करणें आनंदानें भरून आलीं. ३ ाण पुनश्च स्वामींना कधीं भेटतों असें त्यांना झाले. दुसऱ्या दिवशीं सकाळीं तीं दोघेंहि स्वामींच्या दर्शनाला निघालीं. भैरवभट्टाच्या पत्नीनें पिठामिठासह सगळी भोजनसामग्री बरोबर घेतली. त्यांनीं प्रथम कृष्णेंत स्नान केलें आणि मग स्वामीचें दर्शन घेतलें. भैरवभट्ट स्वामींना म्हणाला.

" महाराज, आपण कोण हें कालपर्यंत मला ठाऊक नव्हतें. काल एका अतिथीनें आमचें अज्ञान दूर केलें. आम्ही आपल्याला शरण आहोंत. आपल्या आज्ञेप्रमाणें आम्हीं वागूं. आमच्यावर अखंड कृपा असूं द्यावी."


मनोहर पादुकांची पूजा

स्वामींच्या मुखावर प्रसन्न हास्य झळकलें. ज्या 'मनोहर पादुका' स्वामींना तिथें स्थापायच्या होत्या. त्यांची विधियुक्त पूजा स्वामींनीं भैरवभट्टाकडून करवून घेतली. भैरवभट्टाच्या बायकोनें पुरणावरणाचा स्वयंपाक केला. भैरवभट्टानें पादुकांना महानैवेद्य दाखवला. नंतर स्वामींना पुडी दिली. मग दोघांनीं महाप्रसाद ग्रहण केला स्वामी त्यांच्यावर तुष्टले. त्यांच्याच आग्रहासाठीं तीन महिने त्या ठिकाणीं राहिले. पुढें आश्विन वद्य द्वादशी


आली. त्या दिवशीं स्वामींनीं भैरवभट्टाच्या हस्तें मनोहर पादुकांची महापूजा करवून घेतली आणि तें स्थान सोडण्याचा निर्धार भैरवभट्टाला कळवला. भैरवभट्ट आणि त्याची भार्या दोघेंहि त्यांना लोटांगणीं गेलीं. स्वामी निघून जात आहेत म्हणजे आपला पाठीराखा परमेश्वरच जात आहे अशा भावनेनें त्यांचें दुःख अनावर झालें. स्वामींनीं त्यांना जवळ बसवून घेऊन कृपाळूपणें वरदान दिलें.

" भैरवभट्ट ! माझी आज्ञा मान्य करून तुम्ही या ठिकाणीं येऊन राहिला याबद्दल मला परमसंतोष आहे. यापुढें तुमची चिंता मला लागली. थोड्याच दिवसांत तुमच्या घरीं पाळणा हालूं लागेल. तुम्हांला एक सत्पुत्र लाभेल. त्याच्यापासून पुढें वंशाची वृद्धि होईल. या ठिकाणीं तुमच्यासाठीं मी अन्नपूर्णेची स्थापना करीत आहें ती तुम्हांला काहींहि उणें पडूं देणार नाहीं. मीहि अव्यक्त रूपानें या स्थळीं राहीन. या क्षेत्रीं जे कोणी या पादुकांची भक्तिभावें सेवा करतील, त्यांचे मनोरथ पूर्ण होतील. एक महान् क्षेत्र म्हणून या क्षेत्राची कीर्ति दिगंत गाजेल ! "

एवढें बोलून स्वामींनीं दंड-कमंडलू उचलले. भैरवभट्ट आणि त्याची भार्या यांनीं डोळे भरून त्यांची श्रीमूर्त न्याहाळली आणि त्यांच्या चरणांवर मस्तक ठेवलें.

● ● ●

# तुकाई



जगदंबेचीं तीन स्वरूपें आहेत. महाकाली, महालक्ष्मी आणि महासरस्वती. तुळजापूर हें महासरस्वतीचें स्थान मानतात. मराठवाड्यांतल्या उस्मानाबाद जिल्ह्यांत तुळजापूर येतें. सोलापुराहून तें पंचवीस मैलावर आहे. तें बालघाटाच्या पठारावर वसलें आहे. यालाच यमुनाद्रि म्हणतात. पठाराच्या दुसऱ्या अंगाला थोडेसें खालीं उतरलें कीं देवीचें देऊळ भेटतें. देवीच्या जवळ दीड पुरुष उंचीवरून पोटरीएवढी पाण्याची धार गायमुखांतून खालीं सांडते. त्याच्याजवळच कल्लोळ तीर्थ आहे. देवळाचा सभामंडप ठेंगणाच आहे. जगदंबेची मूर्ति गंडकी शिलेची असून तिला आठ भुजा आहेत. सहा हातांत आयुधें आहेत. सातव्या हातांत महिषासुराची शेंडी आहे. आणि आठव्या हातानें त्याच्या बरगडींत त्रिशूळ खुपसलेला आहे. इथें मंगळवारीं रात्रीं छबिना निघतो. ओवरींत तिच्यासाठीं अनेक रंगीत वाहनें आहेत. नवरात्रांत मोठा उत्सव होतो. देवीच्या शिलंगणाचा थाट अपूर्व असतो. मंदिराच्या दक्षिणस यमाई देवी आहे दुसऱ्या बाजूला टोळभैरव आणि काळभैरव 'हेत घाटाची चढण संपते तिथें घाटशिळा आहे. तिथें एक लहानसें रें मंदिर आहे. घाटशिळा म्हणजे राम–लक्ष्मणांना दक्षिणेची वाट

[illegible]वावला देवी जिथवर आली  आणि ज्या  शिळेवर त्यांची वाट पहात उभी राहिली, ती जागा.

तुळजाभवानी ही महाराष्ट्राची कुलदेवता. शिवाजीमहाराजांवर हिचीच कृपा होती. ही देवी इथें कां आली  आणि  तुळजापूर हें क्षेत्र कसें  बनलें त्याचीच कथा पुढें सांगितली आहे.

● ● ●

दशरथाच्या घरीं कौसल्येच्या उदरीं श्रीरामाचा  जन्म  झाला आणि कैलासावर शिवशंकराच्या हृदयाला आनंदाचें भरतें आलें. ध्यानसमाधींत निमग्न असतांना तो ज्या निर्गुण,  निराकार  परब्रह्माचा अनुभव घेत होता, तेंच  परब्रह्म रामरूपानें पृथ्वीतलावर अवतरल्याचें पाहून त्याचें अंत:करण फुललें. कैलासावरून  त्याचे विशाल नेत्र अयोध्येकडे लागले. रामप्रभु तिथें  लहानाचा  मोठा होत होता. त्याचा दूर्वादलासारखा वर्ण  सर्वांच्या  दृष्टीला  मोह घालीत होता.

तो राजवाड्यांत रांगूं लागला. पुढ काचबंद  अंगणांत  दुडदुड धावूं लागला. नंतर त्याचें  उपनयन  झालें. तो  धनुर्विद्या  शिकूं लागला. त्यानें विश्वामित्राच्या यज्ञाचें  रक्षण  केलें.  पुढें  शिवधनुष्याचा  भंग करून जानकीचें पाणिग्रहण  केलें. हें सर्व  मनोहर रामचरित्र  शिवानें  कैलासाहून  पाहिलें.  रामचंद्राच्या  एकेका लोकोत्तर गुणाचा हार  गुंफून तो जणुं शिवानें  आपल्या गळ्यांत घातला. शिवाचें रसिक मन  रामस्मरणानें नाचूं लागलें.  त्याच्या ध्यानींमनीं राम आणि  रामच  भरून  उरला.  हालाहल  पिऊन त्याच्या अंगाचा भडका उडाला होता. तो किती तरी युगांनीं आज रामनामाच्या जपानें पूर्ण शमला. शिवाची कर्पूरगोर [illegible] समाधान पावलीं.

त्या दिवसापासून कैलासराणा ज्याला त्याला रामाच्याच गोष्टी सांगूं लागला. पार्वतीला तर त्या बसतां उठतां ऐकाव्या लागत. रामानें जनकाच्या दरबारांत मोडलेलें धनुष्य शिवाचेच असल्यामुळें वस्तुतः त्याला क्रोध यायला हवा होता. पण त्याबद्दलहि तो रामाचे गुणच गाऊं लागला. अयोध्येंत दिवसादिवसानें रामचरित्र घडत होतें आणि कैलासावर शिवाच्या हृदयांत त्याचे पडसाद उठत होते.

पण इतकीं वर्षे आनंदाच्या कलांनीं प्रसन्न आणि विकसित होणाऱ्या रामचरित्राला एकाएकीं निराळेंच वळण लागलें. सुखाची जागा शोकानें घेतली. कैकयीच्या मनांत दुस्वास उत्पन्न झाल्यामुळें रामाला चौदा वर्षांकरितां वल्कलें नेसून वनाला जावें लागलें. रामाची चित्कळा सीता त्याच्या मागोमाग निघाली. लक्ष्मणानेंहि त्याचाच मागोवा घेतला. तिघेहि दंडकारण्यांतल्या पंचवटींत आले तिथें रावणानें कपट केलें. आपल्या मारीच मामाला सुवर्णमृग बनवून सीतेच्या पुढें पाठविलें. सीता त्याच्या सौंदर्याला भुलली. आपल्या काचोळीसाठीं तो मृग मारून आणा म्हणून तिनें रामाजवळ हट्ट धरला. राम त्याच्या मागावर गेला आणि थोड्या वेळानें लक्ष्मणहि त्याच बाजूला धावला. पाठोपाठ भिक्षुवेषानें येऊन रावणाने सीतेचें हरण केलें.

राम-लक्ष्मण परत येतात, तों आश्रमांत सीता नाहीं. त्यांनीं पुष्कळ हाका मारल्या; पण तिची 'ओ' येईना. सगळें रान शोधलें; पण ती कुठें गंवसेना. रामाला अनिवार दुःख झालें. तो 'सीते, सीते' म्हणून वेड्यासारखा भ्रमूं लागला. त्याला चांदण्याचेसुद्धां चटके बसूं लागले. लक्ष्मणाला त्यांचें सांत्वन करतांना सायास पडूं लागले. सूर्यासारखा तेजस्वी आणि चंद्रासारखा

वाढवायला देवी जिथवर आली आणि ज्या शिळेवर त्यांची वाट पहात उभी राहिली, ती जागा.

तुळजाभवानी ही महाराष्ट्राची कुलदेवता. शिवाजीमहाराजांवर हिचीच कृपा होती. ही देवी इथें कां आली आणि तुळजापूर हें क्षेत्र कसें बनलें त्याचीच कथा पुढें सांगितली आहे.

● ● ●

दशरथाच्या घरीं कौसल्येच्या उदरीं श्रीरामाचा जन्म झाला आणि कैलासावर शिवशंकराच्या हृदयाला आनंदाचें भरतें आलें. ध्यानसमाधींत निमग्न असतांना तो ज्या निर्गुण, निराकार परब्रह्माचा अनुभव घेत होता, तेंच परब्रह्म रामरूपानें पृथ्वीतलावर अवतरल्याचें पाहून त्याचें अंतःकरण फुललें. कैलासावरून त्याचे विशाल नेत्र अयोध्येकडे लागले. रामप्रभु तिथें लहानाचा मोठा होत होता. त्याचा दूर्वादलासारखा वर्ण सर्वांच्या दृष्टीला मोह घालीत होता.

तो राजवाड्यांत रांगूं लागला. पुढ काचबंद अंगणांत दुडदुड धावूं लागला. नंतर त्याचें उपनयन झालें. तो धनुर्विद्या शिकूं लागला. त्यानें विश्वामित्राच्या यज्ञाचें रक्षण केलें. पुढें शिवधनुष्याचा भंग करून जानकीचें पाणिग्रहण केलें. हें सर्व मनोहर रामचरित्र शिवानें कैलासाहून पाहिलें. रामचंद्राच्या एकेका लोकोत्तर गुणाचा हार गुंफून तो जणुं शिवानें आपल्या गळ्यांत घातला. शिवाचें रसिक मन रामस्मरणानें नाचूं लागलें. त्याच्या ध्यानींमनीं राम आणि रामच भरून उरला. हालाहल पिऊन त्याच्या अंगाचा भडका उडाला होता. तो किती तरी युगांनीं आज रामनामाच्या जपानें पूर्ण शमला. शिवाची कर्पूरगौर [illegible] समाधान पावली.

त्या दिवसापासून कैलासराणा ज्याला त्याला रामाच्याच गोष्टी सांगूं लागला. पार्वतीला तर त्या बसतां उठतां ऐकाव्या लागत. रामानें जनकाच्या दरबारांत मोडलेलें धनुष्य शिवाचेच असल्यामुळें वस्तुतः त्याला क्रोध यायला हवा होता. पण त्याबद्दलहि तो रामाचे गुणच गाऊं लागला. अयोध्येंत दिवसादिवसानें रामचरित्र घडत होतें आणि कैलासावर शिवाच्या हृदयांत त्याचे पडसाद उठत होते.

पण इतकीं वर्षें आनंदाच्या कलांनीं प्रसन्न आणि विकसित होणाऱ्या रामचरित्राला एकाएकीं निराळेंच वळण लागलें. सुखाची जागा शोकानें घेतली. कैकयीच्या मनांत दुस्वास उत्पन्न झाल्यामुळें रामाला चौदा वर्षांकरितां वल्कलें नेसून वनाला जावें लागलें. रामाची चित्कळा सीता त्याच्या मागोमाग निघाली. लक्ष्मणानेंहि त्याचाच मागोवा घेतला. तिघेहि दंडकारण्यांतल्या पंचवटींत आले तिथें रावणानें कपट केलें. आपल्या मारीच मामाला सुवर्णमृग बनवून सीतेच्या पुढें पाठविलें. सीता त्याच्या सौंदर्याला भुलली. आपल्या काचोळीसाठीं तो मृग मारून आणा म्हणून तिनें रामाजवळ हट्ट धरला. राम त्याच्या मागावर गेला आणि थोड्या वेळानें लक्ष्मणहि त्याच बाजूला धावला. पाठोपाठ भिक्षुवेषानें येऊन रावणाने सीतेचें हरण केलें.

राम-लक्ष्मण परत येतात, तों आश्रमांत सीता नाहीं. त्यांनीं पुष्कळ हाका मारल्या; पण तिची ' ओ ' येईना. सगळें रान शोधलें; पण ती कुठें गवसेना. रामाला अनिवार दुःख झालें. तो ' सीते, सीते ' म्हणून वेड्यासारखा भ्रमूं लागला. त्याला चांदण्याचेसुद्धां चटके बसूं लागले. लक्ष्मणाला त्याचें सांत्वन करतांना सायास पडूं लागले. सूर्यासारखा तेजस्वी आणि चंद्रासारखा

आल्हाददायक रामप्रभु; पण त्याच्या मुखावर कळाच उरली नाहीं.

रामाची ती दीनदशा पाहून कैलासावर शिवशंकराचें अंतःकरण व्याकुळ झालें. त्याच्या वाणींतला उत्साह लोपला. रामाच्या एकेका दिवसाची हकीकत तो पार्वतीला सांगूं लागला. पृथ्वी–तलावरच्या एका माणसाचें वेड आपल्या पतीनें घेतलें आहे, त्याचे हर्षशोक हे आपल्या पतीचे हर्षशोक होत आहेत, हें पार्वतीला आवडलें नाहीं. ती एक दिवस शंकराला म्हणाली.



शिव-पार्वतीची दंडकारण्याकडे दृष्टि

"ज्याला तुम्ही पूर्ण परब्रह्म समजतां, तो हाच का तुमचा राम? बायको नाहींशी झाली म्हणून रडणारा, हळहळणारा, व्याकुळ होणारा? हा तर अगदीच सामान्य माणूस! आणि तुम्ही त्याला देव म्हणून डोक्यावर घेतां. त्याचंच ध्यान, त्याचच चिंतन करतां. मला मुळींच आवडत नाहीं हें."

" उमे, असं म्हणूं नकोस. माझ्या रामाला बोल लावूं नकोस. तो पूर्ण परब्रह्मच आहे. पण मानवदेह धारण केल्यामुळे त्याला माणसाच्या भावना, माणसाचीं सुखदुःख दाखवावीं लागत आहेत. आपलं देवत्व लपवून तो आज लौकिकरूपानें वावरत आहे. याच रूपांत राहून त्याला अलौकिक कार्य करायचं आहे. रावणाच्या बंदींत पडलेले तेहतीस कोटी देव त्याला सोडवायचे आहेत.

नराचाच नारायण कसा होतो, याचं उदाहरण त्याला जगासमोर ठेवायचं आहे."

"तें कांहीं सांगू नका तुम्ही. तुमच्या या रामाचं तत्त्व काय आहे हें पूर्ण ओळखलं आहे मीं. मी त्याला हां हां म्हणतां फसवून येईन. बघायचं आहे?"

"तुझी ही घमेंड व्यर्थ आहे. तो तुला, मला, विश्वांतल्या कोणत्याहि शक्तीला फसायचा नाहीं. सर्वांच्या अंतरांत त्याचा वास आहे. तो तुझं कपट चटकन् ओळखील."

"पहातेंच तर."

"पहाच एकदा. म्हणजे तूंहि त्याच्याच भजनीं लागशील." पार्वती अभिमानाच्या भरीस पडून तिथून निघाली. ती दंडकारण्यांत उतरली ती सीतेचें रूप घेऊन.

सीता म्हणजे अगदीं बावन्नकशी सीता. तेच कपडे, तीच गव्हाळी अंगकांति, तोच डोळ्यांतला सात्त्विक भाव, तेंच रेखीव सौंदर्य, तीच चालण्याची ढब, सगळें कांहीं सीतेचें.

श्रीराम एका वृक्षातळीं बसला होता. 'सीते, सीते' असा मुखानें विलाप करीत होता. मस्तक बुंध्याला टेकलें होतें. दृष्टि निरंजनांत लागली होती. लक्ष्मण त्याला विझणवारा करीत होता. त्याची बिचाऱ्याची स्थिति अत्यंत अनुकंपनीय झाली होती. राम क्षणांत त्याच्या खांद्यावर मस्तक टेंकी, तर क्षणांत त्याला मारायला उठे. रामाला केव्हां अन् कसा संताप येईल, त्याला कांहीं नेमच उरला नव्हता. लक्ष्मण एकापरी रामाचा बंधु अन् दुसऱ्यापरी रामाचा भक्त. दोन्ही नात्यांनीं तो ज्येष्ठ बंधूचे दुःखाचे आवेग सहन करीत असे. कशाहि स्थितींत त्याला अंतर देत नसे. अयोध्यावासी जनांचा प्राण असलेल्या रामाचें जीवन संभाळून

ठेवण्याची त्याच्यावरच जबाबदारी पडली होती.

आणि अशा स्थितींत जेव्हां त्यानें सीता येत असलेली पाहिली, तेव्हां तो हर्षानें उचंबळून उठला.



पार्वती सीतेच्या रूपानें रामापुढें उभी

"दादा, दादा, ती बघ वहिनी. ती बघ, त्या आम्रवृक्षाला वळसा घालून इकडेच येत आहे. दादा, तुझं हरवलेलं निधान सांपडलं. माझीं वहिनी—माझी दुसरी आई—मला भेटली. ऊठ,

ऊठ. चल, आपण तिला सामोरे जाऊं."

पण श्रीराम जाग्यावरून हालला नाहीं. त्यानें दृष्टीसुद्धा वळवली नाहीं; मग अंग हालवण्याचें दूरच. लक्ष्मण घाईला आला. रामाचा थंडपणा त्याला मुळींच आवडला नाहीं. "दादा, दादा, असं रे काय करतोस ?" म्हणून तो गयावया करूं लागला. रामाचा हात धरून त्याला उठवूं लागला.

रामानें त्याचा हात झिडकारला आणि त्याला दूर लोटून दिलें. राम उठेना, कसलीहि उत्सुकता दाखविना. तेव्हां त्यालाहि तिथल्या तिथें चुळबूळ करीत रहाणें भाग पडलें. कांहीं झालें तरी तो रामाचा सेवक होता. रामाच्या आज्ञेवांचून त्याला पाऊलसुद्धां उचलतां येत नव्हतें. केवळ दृष्टि तेवढी अनावर होऊन सीतेच्या पावलांकडे लागली होती.

सीता आली. रामाच्या अगदीं जवळ आली. पण रामानें मुळींच हालचाल दाखवली नाहीं. त्यानें आपली नजरसुद्धा बाजूला वळविली. सीता त्या बाजूला गेली आणि हसत हसत पुढें उभी राहिली.

'हें काय ? मी आलें ना. माझ्याकडे पहायचं नाहीं का ? माझ्याशीं बोलायचं नाहीं का ?"

रामानें पुनश्च उलटचा बाजूला दृष्टि वळवली. ह्या अघटित प्रकारानें रामाला परमदुःख होत असल्याचें दिसलें. पण सीतारूपी पार्वतीला तें विचारांत घ्यायचें नव्हतें. तिला रामाला फसवायचें होतें, चकवायचें होतें. ती पुन्हां रामाच्या दृष्टीला सामोरी झाली.

"अहो, मी इतक्या दिवसांनीं आलें, संकटांतून सुटून आलें; माझं स्वागत नाहीं का करायचं ? मी आल्याबद्दल तुम्हांला दुःख का होतं ?"

राम उठला, उभा झाला आणि त्याच्या मुखांतून शब्द निघाले,

"आई, जगदंबे ! खरंच मला दुःख झालं. तूं या स्वरूपांत यायला नको होतंस. तूं या स्वरूपांत आल्यामुळें तुझं मला स्वागतहि करवत नाहीं आणि धिक्कारहि करवत नाहीं. माते, माझी अशी छळणा करूं नको. तूं निजरूप प्रगट कर. म्हणजे मी तुझ्या चरणांवर मस्तक ठेवीन. आई, मी सीतेच्या वियोगानें तळमळतों आहें. अशा स्थितींत तूं माझी करुणा करायची, का माझ्याशीं कपट करायचं ? नको, नको. मी शरण आहें तुला."

त्या क्षणीं पार्वतीचा नूर उतरला. तिने सीतेचें रूप टाकलें. ती पार्वती होऊन विलसूं लागली. राम तिला शरण जाण्याच्याऐवजीं तीच रामाला शरण गेली.

"श्रीरामा, माझा अभिमान हरला. तुझ्याविषयींची तुच्छ बुद्धिहि गेली. तूं पूर्ण परब्रह्म आहेस, हें मी आतां ओळखलं. पण माझी एक शंका दूर कर. तुझ्यासारख्या देवाधिदेवानें पत्नीचा वियोग झाला म्हणून वृक्षपाषाणांना कवटाळीत सुटावं, हा काय प्रकार आहे हें मला कळत नाहीं."

"जगदंबे, हे वृक्ष-पाषाण कोण आहेत हें तुला ठाऊक नाहीं. हे पूर्वी ऋषि-मुनी होते. आपल्या तपाच्या बळानेंच ते स्वर्गाला जायचे. पण त्यांना माझी भक्ति फार. मी पृथ्वीवर अवतार घेणार आहें आणि वनवासी होऊन दंडकारण्यांत येणार आहे, हें त्यांना आधींच कळलें होतें. म्हणून केवळ माझ्या स्पर्शासाठीं ते वृक्षपाषाण होऊन इतकीं वर्षं राहिले. चैतन्यमूर्ति होते ते माझ्यासाठीं स्थावर झाले. मग त्यांच्यावर कृपा नको का करायला ? तूंच सांग."



रामवरदायिनी तुळजा भवानी

उमेला तें पटलें. तिची शंका दूर झाली. तिनें रामाला म्हटले,


"तुझं कल्याण होवो. मी आतां स्वस्थानीं जातें."

त्यावर राम तिला म्हणाला, "आई, मी तुझ्याकडे एक वर मागतों. तूं जाऊं नको. मी आतां इथून पुढें जाणार आहे. चौदा चौकड्यांच्या रावणाला मारून मला देवांना त्याच्या बंदींतून सोडवायचं आहे. माझी चित्कळा सीता मला परत मिळवायची आहे. हें अवतारकार्य पार पाडून मी परत येईपर्यंत तूं इथें या यमुनाद्रीवर उभी रहा. तुझ्या सेवेसाठीं चौसष्ट योगिनींना बोलावून घे. इथें जे जे कोणी येतील, तुझं दर्शन घेतील, त्यांच्यावर कृपा कर. दैत्य माजतील, त्यांना शासन कर. हा यमुनाद्रि हें एक तुझं आदिपीठ होऊं दे."

रामानें असा वर मागितला आणि अंबेला 'तथास्तु' म्हणणेंच भाग पडले.

• • •

# जक्कणाचार्य



बारा ज्योतिर्लिंगें सोडलीं तर इतर शिवक्षेत्रांत गोकर्ण नांवाचें क्षेत्र फार गाजतें. गोकर्ण क्षेत्र कारवारपासून दक्षिणेला पंचवीस मैलांवर आहे. त्यासाठीं गंगावळी नदी ओलांडून पलीकडे जावें लागतें. गांव लहानसेंच; पण समुद्रतीरावर असल्यामुळें सुंदर आहे. इथल्या देवाला महाबळेश्वर असें म्हणतात. देवाच्या आधीं गणपतीचें दर्शन घ्यावें लागतें. हा गणपति चतुर्भुज नसून दोनच हातांचा आहे. इथलें शिवलिंग पिंडीच्या मध्यभागी असलेल्या खळग्यांत फक्त अंगुळभर उंच आहे. देऊळ निराळ्याच घाटाचें आहे. त्यावर द्रविड शिल्पकलेची छाप आहे. देवाच्या उजव्या अंगाला ताम्रगौरी देवी आहे. आपल्या हातांतल्या तराजूंत ती काशी आणि गोकर्ण या दोन क्षेत्रांचें वजन करतें आणि गोकर्णाचें पारडें काशी क्षेत्रापेक्षां जड आहे असें दाखवते. तिच्या जवळच एका खोलगट भागांत आदिगोकर्ण नांवाचें शिवलिंग आहे. ज्या डोंगराच्या पायथ्याला गोकर्ण वसलें आहे त्याला 'शतशृंग' म्हणतात. रावणानें इथें तपश्चर्या केली, असा पुराणांत उल्लेख आहे. कोटितीर्थ हें इथलें सर्वांत महत्त्वाचें तीर्थ. देवस्थानाची व्यवस्था विश्वस्त मंडळींच्या हातीं आहे. महाशिव-

रात्रीला इथें प्रचंड यात्रा जमते. प्रतिपदेला देवाचा रथोत्सव होतो. इथला देवाचा रथ उंच आणि प्रचंड आहे.

एका लोककथेवरून गोकर्ण महाबळेश्वराचें भव्य मंदिर जक्काणाचार्य नांवाच्या कारागिरानें बांधलें, असे कळतें. तीच लोककथा पुढे दिलेली आहे.

● ● ●

जक्कण नांवाचा एक महान् कलावंत कर्नाटकांत होऊन गेला. त्याला होयसळ राजांचा आश्रय होता. तो दगडांच्या मूर्ती उत्तम घडवी त्या मूर्तींत अंगप्रत्यंगांचें सौष्ठव तर असेच; शिवाय मुद्रेवरचे तरल भावहि पकडून ठेवल्यासारखे दिसत. त्यानें जागोजाग बसवलेल्या त्या देवदेवतांच्या मूर्ती भक्तांशीं जणुं बोलताहेत, त्यांना आशीर्वाद देत आहेत असें वाटायचें. मर्मज्ञ, रसिक आणि भक्त सगळेच त्याच्या मूर्तिकलेवर खुष असत.

तो केवळ मूर्तीच घडवीत असे असें नव्हे, तर मोठमोठीं देवळेंहि बांधीत असे. महाद्वारांच्या दगडी चौकटीवर नक्षीकाम करणें, खांब आणि गवाक्षें सुबक प्रकारें कोरणें, भिंतींत आणि कळसांत चित्ररचना करणें, मोठमोठे मंडप उभारणें, अशा सर्व वास्तुकलेंत तो अभिजात पंडित होता.

तो शिल्पकलेचा वेडा होता. सगळा जीव-भाव त्यानें तिच्यांत ओतला होता. किंबहुना त्याचें जीवनच शिल्पमय झालें होतें. एखादा दगड पाहिला, कीं त्याला अव्यक्त अशी देवतेची मूर्ति दिसूं लागे. मग योग्याच्या तन्मयतेनें तो छन्नीवर हातोड्याचे घाव घालीत कल्पनेंतल्या त्या मूर्तीचा एक एक अवयव आकाराला आणूं लागे. त्यापायीं तो तहानभूक विसरे, घरदार विसरे आणि नुकतेंच लग्न करून घरीं आणलेली बायकोहि विसरे.

एकदां तर असें झालें कीं, कुठल्या तरी मंदिराचें काम मिळालें म्हणून तो जो एकदां घरांतून गेला, तो किती तरी वर्षं परतच

आला नाहीं. या गांवांतून त्या गांवांत, या नगरांतून त्या नगरांत, कोणी बोलवील तिकडे जावें, शिव, विष्णु, स्कंद, भगवती, इत्यादि देवतांच्या मूर्ती घडवाव्या, त्या वेगवेगळ्या मंदिरांतून प्रस्थापित झालेल्या पहाव्या, त्याच आनंदांत बेहोष व्हावें आणि एखाद्या धनिकानें वा सामंतानें बोलावलें, कीं त्याचें काम करण्यासाठीं त्याच्याबरोबर पुढें निघून जावें, असा त्याचा कार्यक्रम चालला होता.

बिचारी जक्कणाची बायको ! तो घरांतून निघून गेला त्या वेळीं ती गर्भवती होती. डोहाळे सोहाळे राहिले बाजूला; पण ती जड जिवाची असतांना तिला धड खायलासुद्धा मिळालें नाहीं. तिची सर्व प्रकारें आबाळ झाली. तशांतच ती एक दिवस प्रसूत झाली. तिला एक सुदृढ आणि सुंदर असा मुलगा झाला. डंकण असें तिनें त्याचें नांव ठेवलें. डंकण दिशीं माशीं वाढूं लागला. अवखळपणा करूं लागला. आईला अनावर होऊं लागला. तिला वाटे, नवऱ्यानें यावें, बाळाचें कोडकौतुक करावें आणि आपण सुखाचा संसार करावा. तिचा एक डोळा नवऱ्याच्या वाटेकडे लागलेला असे आणि दुसऱ्या डोळ्यानें ती आपल्या लेंकरावर नजर ठेवीत असे. आपला आणि मुलाचा निर्वाह चालवतांना आणि अंगभर घडुतें मिळवतांना तिला फार यातायात पडे. पण तरीहि तिनें आपल्या मुलाला काहीं उणें पडूं दिलें नाहीं. त्याची वाढ खुंटूं दिली नाहीं. मायेच्या उबेंत त्याच्या जीवनाचा विकास करीत ती कालक्रमणा करूं लागली.

थोड्याच वर्षांत तिला दिसलें, कीं आपला मुलगाहि बापासारखाच छांदिष्ट आहे. जक्कणाच्या रक्तांतलें कलेचें वेड त्याच्याहि रक्तांत उतरलें आहे. डंकणालाहि दगडांचेंच वेड लागलें होतें. एखादी

लांब–रुंद शिळा दिसली, कीं तो घटकान् घटका तिच्याकडे पहात राही. देह खुंटासारखा स्तब्ध आणि दृष्टि एकटक, अशा अवस्थेत उन्हातान्हाचे चटके सुद्धा त्याला बाधत नसत. तो त्या शिळेंत कांहीं तरी पाही, कांहीं तरी निश्चित करी आणि मग एखादा ठिसूळ दगड घेऊन त्या शिळेवर रेघोट्या ओढी. कुठेंहि मूर्ति दिसो; त्याची एकदम तंद्रीच भुले. पाहून-पाहून, विचार करकरून त्यानें स्वतःच बरीचशी मूर्तिकला अवगत करून घेतली. अडगळींत पडलेलीं बापाची छन्नी, हातोडी घेऊन तोहि दगड कोरूं लागला. आपल्या घराभोंवतींच्या दगडांत त्यानें देवदेवतांची सृष्टि निर्माण करून ठेवली. जें शिल्प मनांत भरलें तें स्वतःच्या हातांनीं आकाराला आणल्यावांचून त्याला चैनच पडेनासें झाले. गांवांतले लोक



डंकण रडत आहे

त्याच्या या उपजत गुणांचें कौतुक करूं लागले. छन्नी-हातोडा वापरून वापरून त्याच्या कोंवळ्या आरक्त तळहातांना घट्टे पडले. त्याचीं नाजूक बोटें बालवयांतच टणक झाली.

गांवांतल्या बरोबरीच्या मुलांत त्याच्याबद्दल चर्चा सुरू झाली. पण त्यांतहि त्याचा मत्सर करणारीं कांहीं मुलें होतींच. बिनबापाचा मुलगा म्हणून तीं त्याला नावें ठेवूं लागलीं. एक दिवस तर डंकणाच्या तोंडावरच एका मुलानें त्याचा पाणउतारा केला. ' बिनबापाचा मुलगा ' हे कडवे बोल त्या कुमाराच्या कोंवळ्या अंत:करणाला झोंबले. तो खिन्न मुद्रेनें घरीं आला आणि एका कोपऱ्यांत रडत बसला. आई जवळ आली तेव्हां त्यानें तिला बापाबद्दल प्रश्न विचारले. आईनें त्याला सगळा वृत्तांत सांगितला. त्यावरून आपला बाप परागंदा आहे हें तर त्याला कळलेंच; शिवाय तो श्रेष्ठ प्रतीचा शिल्पकार आहे हेंहि कळलें. या दुसऱ्या गोष्टीचा त्याला फार आनंद झाला. आपला बाप कलावंत आहे, त्याला आपण शोधून काढलेच पाहिजे, असें त्यानें मनाशीं ठरवलें.

मुलाचा हा निर्धार ऐकतांच आईचें हृदय आकुळ-व्याकुळ झालें. तिला वाटलें, नवरा एक परदेशी झालाच आहे; आतां मुलगा त्याच्या मागावर गेला तर तोहि असाच भरकटेल आणि आपल्याला अंतरेल. नवरा नाहीं आणि मुलगाहि नाहीं, अशा स्थितींत आपलें आयुष्य वाऱ्यावरच्या वावडीसारखें होईल, या जाणिवेनें तिची मुद्रा करुणास्पद झाली. ती कांहीं केल्या मुलाला जाण्याची परवानगी देईना आणि डंकण आपला हट्ट सोडीना. त्या प्रेमळ मायलेकरांमध्यें याच एका मुद्द्यावर विरोध निर्माण झाला.

पण शेवटीं मुलाच्या हट्टापुढें तिला माघार घ्यावी लागली. कष्टानें कां होईना; पण ' जा बाबा ' असे शब्द तिच्या ओठांतून बाहेर पडले. तिनें त्याला शिदोरी बांधून दिली आणि अश्रूंनीं ओला करून निरोपहि दिला.

डंकण गांव सोडून निघाला. या गांवांतून त्या गांवांत अशी

त्याची भ्रमंती सुरू झाली. ज्या गांवांत देऊळ बांधलें जात आहे, मूर्ति घडवली जात आहे, असें त्याला कळे, तिथें तिथें तो जाई. प्रत्येक माणसाचा कसून तपास करी आणि या मंडळींत आपला बाप नाहीं असें समजल्यावर हिंपुटी होऊन पुढच्या गांवाचा रस्ता धरी.

असाच एका गांवीं पोंचला असतां एका वृक्षछायेंत एक गृहस्थ शिळेवर मूर्ति घडवीत असलेला त्याला दिसला. डंकण त्याच्या पाठीमागें जाऊन उभा राहिला. मूर्तिकारानें बाह्य रेखा आंखून घेतली होती. आणि छन् छन् शिळेचे तुकडे उडवीत तो मूर्तीला स्पष्ट आकार आणीत होता. आपल्या मागें एक अनोळखी कुमार येऊन उभा आहे, हें त्याला भावलेंसुद्धा नाहीं. त्याच्या सगळ्या मनोवृत्ती त्या क्षणाक्षणानें उमलणाऱ्या मूर्तींत एकजीव झाल्या होत्या. तो बाह्य जग तर विसरला होताच; पण स्वतःलाहि विसरला होता.

" मूर्तिकार दादा ! तुमचे हे श्रम व्यर्थ आहेत." त्या अनोळखी मुलानें उच्चारलेले शब्द ऐकतांच तो एकदम दचकला. त्यानें मागें वळून पाहिलें. तिथें एक कोवळा कुमार उभा होता मूर्तिकारानें एकवार त्याला आपादमस्तक न्याहाळलें; पण त्याच्याबद्दल प्रेम वाटण्याऐवजीं त्याला त्या मुलाचा रागच आला. ' तुझे श्रम व्यर्थ आहेत ' हे त्याचे उद्गार म्हणजे आपल्या कलेचा अपमान आहे, असें त्याला वाटलें. डंकणाच्या डोळ्याला डोळा भिडवून यानें विचारलें.

" माझे श्रम व्यर्थ ?"

" होय दादा. " डंकणानें न कचरतां उत्तर दिलें.

" कां म्हणून ?"

" तुम्हीं घेतलेला दगड चांगला नाहीं म्हणून."

"मूर्तीच्या दगडाचें ज्ञान माझ्यापेक्षां तुला अधिक आहे ?"

"निदान या दगडापुरतं तरी."

"काय झालं आहे या दगडाला ?"

"बाकी सगळा ठीक आहे; पण मूर्तीचा नाभिप्रदेश जिथें येतो. नेमकं तिथेंच या दगडांत एक छिद्र आहे."

शिल्पकाराला त्या मुलाच्या धिटाईचा विलक्षण राग आला. तो ताडकन् उठून डंकणाला सामोरा उभा राहिला. दगड पारखून माझे काळचाचे पांढरे झाले, मूर्ति घडवून घडवून हात लोखंडाचे झाले आणि हा पोरटा मला दगडाचें ज्ञान सांगणार. अशा प्रकारची त्वेषयुक्त भावना त्याच्या विस्फारलेल्या डोळचांत आणि स्फुरण पावणाऱ्या ओठांत दिसत होती. आधींच तो श्रमला होता. घामानें निथळला होता. आणि त्यांत ही अपमानाची आग ! या पोरट्याला चांगली अद्दल घडवली पाहिजे अशा विचारानें त्यानें म्हटलें,

'तूं म्हणतोस, या दगडाला मधें पोकळी आहे. मी म्हणतों, नाही: बेहत्तर आहे माझी मूर्ति फुकट गेली तर. पण तुझा खोटेपणा उघडकीला आणण्यासाठीं मी या मूर्तीच्या नाभींत छन्नी ठोकणार आहें. जर तिथें पोकळी सांपडली नाहीं, तर काय प्रायश्चित्त घेशील ते सांग."

"तुम्ही सांगाल तें." त्या कुमारानें उत्तर दिलें.

"तुझा उजवा हात तोडून द्यावा लागेल."

"ठीक आहे. पण छिद्र आढळलं तर तुम्ही प्रायश्चित्त घ्याल ?"

"मीहि माझा उजवा हात तोडून देईन."

शिल्पकाराला विलक्षण आत्मविश्वास होता. एवढ्या अवधींत त्यांच्या भोंवतीं बरेच लोक गोळा झाले होते. त्यांना उद्देशून तो बोलला,

"मंडळी, ऐकलं ना तुम्हीं ? छिद्र नाहीं आढळलं, तर हा घमेंड-खोर मुलगा आपला उजवा हात तोडून देणार आहे. तुम्ही साक्ष आहांत या गोष्टीला. हा मी घाव घालतों."



जक्कण हात तोडून टाकतो.

आणि दुसऱ्याच क्षणीं छन्नीवर हातोडा आदळला. 'छन्न्' असा आवाज येण्याऐवजीं बसका आवाज उमटला, वाटीएवढा टवका खालीं दबला. खरोखरीच आंत पोकळ जागा होती. तिच्यांत नारळांतल्याप्रमाणें पाणी होतें. आणि त्यांत एक पिवळसर बेडकी पाय लांब करून तरंगत होती. तें आश्चर्य पाहून शिल्पकाराचें पाणी झरझर उतरलें. त्याच्या थरथरणाऱ्या हातांतून छन्नी आणि हातोडा

आपसुख गळून पडला. कुमाराच्या मुद्रेवर मात्र तेज फांकलें. जमलेल्या सर्व लोकांनीं त्या मुलाच्या ज्ञानाची प्रशंसा केली. हा कोण, कुठला, याची चौकशी करावी, असा विचार ते करीत आहेत, तोंच आणखी एक आश्चर्य त्यांना पहायला मिळालें.

शिल्पकारानें जवळचें हत्यार उचलून आपला हात एका घावांत तोडून घेतला होता.

तें पाहून कुमाराला दुःख झालें. मस्करीची अशी कुस्करी होईल अशी त्याची कल्पना नव्हती आणि तशी इच्छाहि नव्हती. शिल्पकाराच्या डोळ्यांत आता क्रोध नव्हता. होती ती अनुकंपा आणि तीहि स्वतःबद्दल. त्यानें पुढें होऊन डाव्या हातानें त्या कुमाराची पाठ थोपटली आणि विचारलें,

" दगडांचं इतकं सूक्ष्म ज्ञान तूं कोठून पैदा केलंस ?"

" माझं तें उपजत आहे. या गुणाचा मला वारसा मिळालेला आहे. माझा बाप एक नामांकित शिल्पकार आहे."

" शिल्पकार? काय नांव त्याचं ? "

" त्याचं नांव जक्कण मीं त्याच्याच शोधाला निघालों आहे. तुला त्याचा ठावठिकाणा माहीत असला तर सांग "

शिल्पकार एकदम रडवेला झाला. दाटल्या कंठानें त्यानें म्हटलें,

" पोरा, पोरा तुझा बाप तुझ्यासमोर उभा आहे. त्याचा उजवा हात आतां तुटला आहे. तो आतां शिल्पकार उरला नाहीं. पण हरकत नाहीं. माझी कला तुझ्या काळजांत आणि हातांत उतरली आहे, एवढ्यानंच मी कृतार्थ झालों."

' बाबा ' म्हणून डंकणानें जक्कणाचे पाय धरले. त्याला बाप मिळाला होता; पण तो आतां जन्माचा अपंग झाला होता. त्याच्या धाष्टर्यामुळेंच ही अशी अघटित घटना घडली होती. डंकण ओक्साबोक्शीं रडूं लागला. जक्कणानें आपल्या दीड हातानें त्याला उचललें

आणि हृदयाशीं कवटाळलें. वरून त्याच्या अश्रूंचा आणि पाठीवर भळभळत्या रक्ताचा अभिषेक डंकणानें अनुभवला.

बापलेक तिथून परतून आपल्या गांवाच्या वाटेला लागले. घरीं आल्यावर जक्कणाच्या बायकोनें तें दृश्य पाहिलें आणि ती घळा-घळां रडूं लागली. तें आनंदांतलें दुःख तिला असह्य झालें. जक्कणानें क्रोधाच्या भरांत हात तोडून घेतला त्या वेळीं त्याला कांहीं वाटलें नाहीं. पण मग मात्र त्याची स्थिति केविलवाणी झाली. यापुढें आपण कलेला मुकलों, अतएव आनंदालाहि मुकलों या जाणिवेनें त्याचा आत्मा माशासारखा तडफडूं लागला. आपलें जीवन आतां भकास झालें, भारभूत झालें, ही भावना भुंग्यासारखी त्याचें काळीज पोखरूं लागली. अशा अवस्थेंत एके दिवशीं उत्तर रात्रीं कधीं तरी त्याचा डोळा लागला आणि त्यांत त्याला एक स्वप्न पडलें. स्वप्नांत देवानें प्रगट होऊन त्याला सांगितलें, कीं 'तूं जर माझें देऊळ बांधशील, तर तुझा तुटलेला हात परत उगवेल.'

•




जक्कण खडबडून जागा झाला. शेजारीं झोंपलेल्या डंकणालाहि त्यानें उठवलें. पहाटेचें स्वप्न त्याला सांगितलें. दोघांनीहि मंदिर बांधायचें ठरवलें. सकाळीं उठून ते निघाले आणि एका विशिष्ट स्थळीं म्हणजे टुमकूरजवळच्या काइदल गांवीं आले. त्यांनी तिथं महाप्रयासानें मंदिर उभारलें. मंदिरांत

देवप्रतिष्ठा होतांच इकडे जक्कणाला हात फुटला. जक्कण पुन्हां दोन हातांचा झाला, सर्वांना आनंद झाला आणि आश्चर्यहि वाटलें.

आणि त्या दिवसापासून देहत्याग करीपर्यंत जक्कणानें आपल्या मुलाच्या साहाय्यानें दक्षिणेंत किती तरी मंदिरें उभारलीं.

● ● ●

# भीमरथी



भीमाशंकर हें क्षेत्र पुणें जिल्ह्यांत पुण्यापासून पाऊणशें मैलांवर आहे. मंचर घोडेगांवावरून पोखरीघाटांतून या ठिकाणीं जावें लागतें. भीमाशंकर हा सह्याद्रीतलाच एक डोंगर आहे. भीमा नदीचा इथूनच उगम होतो. आजचें भीमाशंकराचें देऊळ हें नाना फडणिसांनीं बांधले आहे. समोर तीन-चार मण वजनाची मोठी घंटा आहे. जवळच मोक्षकुंड नांवाचे तीर्थ आहे. ऋचीक नांवाच्या एका ऋषीनें इथें स्नान आणि तर्पण करून पितरांचा उद्धार केला. तिथून खालच्या अंगाला गुप्त भीमाशंकर नांवाचे स्थान आहे. तिथून भीमा नदी तीनशें फूट उंचीवरून खालीं उडी घेते. वरच्या अंगाला देवीचें देऊळ आहे. तिथून थोडयाच अंतरावर एक खोलकडा आहे. त्याचें नांव कोकणकडा. हनुमान तळयाजवळ मारुतीचें देऊळ आहे. इथें शिवरात्रीला मोठी यात्रा

भरते. भीमाशंकर हें बारा ज्योतिर्लिंगांपैकीं असून हें क्षेत्र निर्माण व्हायला कोणती घटना कारणीभूत झाली, ती कथा पुढें दिली आहे.

• • •

अमरपुरींत देवेंद्राचा दरबार भरला होता. देवांचा राजा इंद्र आपल्या रत्नजडित सिंहासनावर बसून सुखोपभोग घेत होता. अप्सरा त्याच्या मस्तकावर छत्रचामरें ढाळीत होत्या. उजव्या बाजूला देवगुरु बृहस्पति आपल्या आसनावर विराजमान झाला होता. त्याच्यापुढें अनेक ऋषि-मुनि सभागृह शोभवीत होते. दुसऱ्या अंगाला राजर्षींच्या मस्तकावरचीं किरीट कुंडलें लखलखत होतीं. समोर संगीताचा साज जमूं लागला होता. देवेंद्राची मुद्रा प्रसन्न आणि उत्सुक होती. नृत्य आणि गायन यांचा आनंद तो आज मनसोक्त लुटणार होता.

पण एवढ्यांत अष्टदिक्पाल देव जमावानें दरबारांत दाखल झाले आणि त्यांनीं देवेंद्राला नम्र अभिवादन केलें. इंद्रानें त्यांच्यावर नजर टाकली. ते सगळे घाबरलेले दिसत होते. त्यांच्या मुखावर कळा नव्हती. दृष्टींत तेज नव्हतें. मनांत उत्साह नव्हता. कसल्या तरी भयंकर चिंतेनें त्यांचें शरीरं आणि मन ग्रासलेलें आहे असें दिसत होतें. या त्यांच्या अवस्थेचा इंद्राला कांहीं उमज पडेना. त्यानें विचारलें,

" देव हो, तुम्ही असे मलूल कां दिसतां ? काय झालें तुम्हांला ? देवराज्यावर कसल्या तरी संकटाची छाया पडूं लागली आहे काय ?"

देवेंद्राला आपली स्थिति उमगली आणि त्यानें नेमका प्रश्न विचारला हें ऐकून देवांना बरें वाटलें. त्यांच्यापैकीं एक जण हात जोडून आणि वाणींत कारुण्य आणून बोलूं लागला,

" देवेंद्र, देवराज्यावर फार मोठं संकट कोसळू पहात आहे. त्रिपुरासुर दैत्य मेरु पर्वताच्या शिखरावर अति उग्र तप आचरीत आहे. त्यानें कामक्रोध जिंकले आहेत. इंद्रियें आवरलीं आहेत. आहार-विहार सोडला आहे. दोन्ही भुजा उंच उभवून आणि



त्रिपुरासुर तप करतो

पायाच्या एका अंगठ्यावर उभा राहून तो मंत्र जपीत आहे. त्याची एकटक दृष्टि सूर्याकडे लागलेली आहे. त्याला देवराज्य मोडायचें आहे, दैत्यराज्य जोडायचं आहे. त्रैलोक्याच अधिराज्य मिळविण्याची त्याची इच्छा आहे. "

इंद्रानें हें ऐकलें आणि तो तुच्छतापूर्वक म्हणाला,

" एवढंच ना, मग त्याची काळजी नको. आपण त्याचा तपोभंग करूं. मी आतां एखाद्या अप्सरेला त्याच्याकडे पाठवतों. तो तिला भुलेल आणि कुत्र्यासारखा तिच्यामागून येईल. "

" देवेंद्र, आपण भलती समजूत करून घेऊं नका. त्रिपुरासुर त्या जातीचा नाहीं. तो ज्या पर्वतावर बसला आहे, तो मेरु एक वेळ भंगेल, पण त्रिपुरासुर भंगणार नाहीं. महाराज, स्वर्गावरचं हें संकट सामान्य नाही. आपण ताबडतोब पण योग्य दिशेनें त्याच्या प्रतिकाराला उभं राहिलं पाहिजे. "

त्यावर देवेंद्र पुढें कांहीं बोलला नाहीं. तो स्तब्ध झाला. मनांतून घाबरलासुद्धा. ताबडतोब त्यानें सभा विसर्जन केली. तो जड पावलानी आणि अस्वस्थ मनानें स्वस्थानीं आला. त्रिपुरासुर त्याच्या मनांत भिनला. विचार करकरूनहि त्याला प्रतिकाराचा मार्ग सुचेना.

मग त्यानें सरळ ब्रह्मलोकाचा मार्ग धरला. विधात्याचे चरण वंदून तो त्याला ' रक्ष रक्ष ' म्हणाला. ' तुला कुणीं गांजलें ' म्हणून ब्रह्मयानें त्याला विचारले. इंद्रानें त्रिपुरासुराच्या तपाची आणि महत्त्वाकांक्षेची दुष्ट वार्ता त्याला कथन केली. ' त्या दैत्यपतीचा वध करा किंवा मला पुढची गति दाखवा ' अशी त्याला गळ घातली. ब्रह्मदेवाचें चित्त द्रवलें. ' निश्चित रहा ' असा देवेंद्राला आशीर्वाद देऊन ब्रह्मदेव मेरु पर्वतावर उतरला आणि त्रिपुरासुरापुढें प्रगट झाला.

" दैत्यनाथा, मी प्रसन्न आहें. हवा तो वर माग. "

त्रिपुरानें डोळे उघडले आणि समोर ब्रह्मदेवाला पाहिलें. तो वरदानी होऊन आला आहे; हें समजून त्याला हर्षाचें उधाण आलें. त्यानें नमस्कार करून वरदान मागितलें.

" माझ्यापाशीं सोन्याचें, रुप्याचें आणि लोखंडाचें अशीं तीन पुरें आहेत. तीं उडतीं विमानें होतील आणि कोणत्याहि शस्त्रास्त्रानें त्यांचा भंग होणार नाहीं, असा मला वर द्या. मी त्या गगनगामी पुरांच्या साहाय्यानें त्रैलोक्यांत अजिक्य होईन."

तें ऐकून ब्रह्मदेव प्रत्युत्तर त्याला बोलला.

" तूं मागतोस तसा वर मी तुला देतों; पण त्यांत एकच छिद्र राहील. जो कोणी एकाच बाणानें हीं पुरें विंधील, तो त्यांच्यासह तुझाहि नाश करील."

एवढें बोलून ब्रह्मदेव अंतर्धान पावला. त्रिपुरासुरानें तप सोडलें. मेरु पर्वतावरून तो खालीं उतरला. प्रथम त्यानें संपूर्ण पृथ्वीचें राज्य मिळविलें. पण तेवढयानें त्याची भूक शमली नाहीं. त्यानें स्वर्गांत जाऊन देवेंद्राला युद्धाचें आव्हान दिलें. अष्टदिक्पालांसह सर्व देवांचा थोडयाच कालांत पराभव केला. इंद्राला राज्यसिंहासनावरून खालीं लोटलें. जी गत स्वर्गाची तीच पाताळाचीहि केली. तो त्रैलोक्याचा राजा झाला. आतां कांहीं जिंकायचें शिल्लक उरलें नाहीं.

मग तो सर्व प्रकारचे उपभोग घेऊं लागला. लोकांना निरर्थक पीडा देऊं लागला. उन्मत्त होऊन त्यानें ऋषीमुनींचे आश्रम मोडले. यज्ञयागादि सारीं पुण्यकर्मं बुडविलीं. स्वाहाकार, स्वधाकार बंद पाडले.

स्वर्गांतून भ्रष्ट झालेला इंद्र पृथ्वीवर उतरला, भणंगभिकाऱ्यासारखी त्याची दशा झाली. कुठें अन्नपाणी मिळेना. कुणी विचारीना, आपलें राज्य परत कसें मिळेल, त्रैलोक्य त्रिपुरासुराच्या पीडेंतून कसें मुक्त होईल, याची त्याला विवंचना लागली. तो सगळीकडे वणवण भटकला. फिरतां फिरतां सह्याद्रीवर आला. तिथें त्याला एक स्वयंभू शिवलिंग दिसलें. तो घटकाभर तिथें विसावला. तिथें नाना प्रकारचे वृक्ष दाटीवाटीनें उभे होते. त्यांच्या अंगांना बिलगून वेली वर चढल्या होत्या. त्यांच्या फुलांचा सुगंध सगळीकडे

दरवळत होता. मंद वारा वहात होता. शीतळ झरे झुळझुळत होते. सगळीकडे छाया पसरली होती. आकाश अगदीं हाताला लागावें इतकें तें गिरिशिखर उंच होतें. सगळा निसर्ग निवांतपणें, निश्चिंतपणें आभाळाच्या निळ्या छताखालीं नांदत होता.



इंद्राला शिवलिंग दिसतें.

इंद्राचा आत्मा त्या ठिकाणीं प्रसन्न झाला. त्याला वाटलें कीं, हें महादेवाचें स्थान आहे ऊन, पाऊस, वारा, दंव, धुकें यांच्या रूपानें सदाशिव इथें क्रीडा करतो आहे. त्यानें तिथल्या शिवलिंगाला साष्टांग नमस्कार करून तिथेंच तप करावयाचें ठरवलें. महादेव या ठिकाणीं लवकर प्रसन्न होईल आणि तो प्रसन्न झाल्यावर आपले सर्व मनोरथ पूर्ण करील, असा त्याला विश्वास वाटला. लगेच पद्मासन घालून त्यानें शिवमंत्राचा अखंड जप सुरू केला.

कांहीं वर्षें त्याला अनुष्ठानांत घालवावीं लागलीं. पण अखेरीस कैलासराणा चंद्रमौळी इंद्रापुढें उभा झाला. इंद्राच्या मस्तकीं वरदहस्त ठेवून त्यानें त्याला उठवलें. इंद्रानें आपलें गाऱ्हाणें त्याच्या कानीं घातलें. सदाशिव त्याला म्हणाला,

' तूं मुळींच चिंता करूं नको. त्रिपुरासुराची मरणघटिका आतां जवळ आली असं समज. आजपासून सातव्या दिवशीं मी त्याचा निःपात करीन."

आणि त्याच क्षणीं शंकरानें भीमरूप धारण करून नंदी आणि शिवगण यांना पाचारण केलें. हातामध्यें त्रिशूळ घेऊन उभा राहिलेला शंकर काळाग्नीसारखा प्रज्वलित दिसूं लागला. त्यानें जटाजूट सोडून झटकतांच जिकडे तिकडे विजाच विजा चमकूं लागल्या. भूतगणांनीं आरोळ्या ठोकल्या. सगळें वातावरण दणाणून गेलें त्या धाकानें भूमीवर प्रलयकाळ ओढवतो की काय, असें लोकांना वाटूं लागलें.

पण त्रिपुरासुराशीं झुंजायचें म्हणजे शंकराला एक प्रचंड रथ हवा होता. तो कुठें मिळणार आणि कोणता विश्वकर्मा बनवणार ? रुद्रानें मग सह्याद्रीचाच रथ बनवला सूर्यचंद्राचीं चक्रें त्याला जोडलीं. ब्रह्मदेवाला सारथी म्हणून पाचारलें. विष्णु बाणरूप होऊन त्याच्या भात्यांत शिरला.

त्रिपुरासुराला हें वर्तमान समजलें. त्यानें दानवसैन्य गोळा केलें. आपलीं तिन्हीं पुरें सज्ज केलीं अशी सर्व सिद्धता करून तो शंकराबरोबर झुंज घ्यायला निघाला. दोन्हीं सैन्ये एकवटलीं. शंख, दुंदुभि, काहाळा, मांदळ, इत्यादि रणवाद्यें वाजूं लागलीं सगळीकडे कोल्हाळ माजला. तुंबळ युद्ध सुरू झालें. उभय दळींचे वीर ' धरा, मारा ' अशा हांका फोडूं लागले. कोणाच्या लोहशृंखला आदळूं लागल्या. कोणाच्या तलवारी 'तळपूं लागल्या. कोणाच्या गदा, कोणाचे परशु, कोणाचे त्रिशूळ, अशीं शस्त्रास्त्रें मस्तकें चूर्ण करूं लागलीं.

एवढ्यांत त्रिपुरासुर शिवासमोर येऊन थडकला आणि गर्वानें

छाती पिटीत शिवाची निंदा करूं लागला. 'तूं बैलावर बसतोस. स्मशानांत निजतोस. भुतांखेतांबरोबर वागतोस. तूं रे काय माझ्याशी लढणार ?' अशा दुष्ट वचनानीं आपली जिव्हा विटाळीत त्यानें शिवावर शस्त्र सोडलें. शिवानेंहि 'घे घे' म्हणत



शिव त्रिपुरावर बाण सोडतो.

परिघ भिरकावला. त्रिपुरानें त्याचें निवारण केलें. नीलकंठ क्रोधानें तप्त झाला. त्यानें त्रिशूळ सोडला तो प्रलयकालीन विजेसारखा त्रिपुराच्या हृदयावर आदळला. तो मूर्च्छा येऊन धरणीवर कोसळला. एक प्रहर त्याची हालचाल थांबली.

सावध होतांच त्यानें युद्धाचा पवित्रा बदलला. आपलीं तिन्हीं पुरें त्यानें आकाशांत वेगवेगळ्या ठिकाणीं मांडलीं. कधीं यांत, तर

कधीं त्यांत जाऊन तो तिथून बाणांचा वर्षाव करूं लागला. सगळें देवसैन्य जर्जर झालें शिवगणांमध्यें हाहाकार उठला शिव भीमरूप झाला त्याचे डोळे खदिरांगारासारखे झाले. विष्णुरूपी बाण त्यानें बाहेर काढला. तो पिनाक धनुष्याला जोडून त्यानें तिन्ही पुरांवर एकदम नेम धरला. एकाच बाणानें तीं फोडून जमिनीवर पाडलीं शिवाच्या तृतीय नेत्रांतून जे आगीचे लोळ निघाले, त्यानें तीं तिन्हीं पुरें भस्म झालीं. त्रिपुरासुरहि त्याच आगींत जळून मेला. दैत्यसेना दशदिशा पळाली. युद्ध थांबलें. सर्वत्र शांति झाली.

पण या युद्धकर्मानें शिवाला खूप श्रम झाले. त्याच्या अंगांतून घामाचा पूर लोटला. क्षणमात्र तिथेंच बसून त्यानें विश्रांति घेतली. एवढ्यांत सगळे देव सभोंवती जमले आणि शिवाचा जयजयकार करूं लागले. 'जय जय भवानीरमणा' म्हणून त्यांनीं स्तवन मांडलें. शंकर संतुष्ट झाला. 'इच्छेला येईल तो वर मागा' असें त्यानें सर्वांना म्हटलें. देव हर्षभरित होऊन म्हणाले,


"शिवशंकरा, तुझें घर्मोदक जिथून वाहिलें, ती सरिता होऊं दे. जगाला पावन करणारें हें तीर्थ बनूं दे."

तें ऐकून शिव म्हणाला,

"मी आतां जलरूप होऊन या प्रवाहांत मिसळतों. नदीच्या रूपानें सागराला भेटतों. या पर्वतरूपी रथावर या सरितेचा उगम झाला म्हणून हिचें भीमरथी असें नांव ठेवा. हिच्या स्मरणमात्रेंच मुक्ति मिळेल. या तीर्थांत जे स्नान करतील ते अंतीं कैलासाला पोहोंचतील भीमशंकर हें माझें ज्योतिर्लिंग या ठिकाणीं आहे. त्याची प्रेमभावें पूजा करावी आणि संसारांत सुखानें नांदावें."

एवढें बोलतांच पर्वतशिखरावरून पाण्याचा लोंढा फुटला. तो खळाळत, फेंसाळत, वळणावांकणांनीं पायथ्याकडे निघाला. ताबडतोब त्या ठिकाणीं देव, मानव व ऋषी गोळा झाले त्या सरितेच्या उगमावर स्नान करतांना त्यांना परम उल्हास वाटला. आणि त्या दिवसापासून 'भीमाशंकर' हें स्थान महान् पुण्यक्षेत्र म्हणून पुराणांमध्यें गाजूं लागलें.

# —गौतमी गंगा



त्र्यंबकेश्वर हें बारा ज्योतिर्लिंगापैकी एक शिवस्थान नाशिकपासून अठरा मैलावर आहे. वाटेंत अंजनेरी हा पर्वत लागतो. त्यावर वानराच्या आकाराची एक मोठी शिळा दिसते. तिला मारुतीची आई अंजनी असें म्हणतात. इथलें त्र्यंबकेश्वराचें मंदिर मोठें आणि सुंदर असून तें नानासाहेब पेशव्यांनीं बांधलें आहे. इथें शिवलिंग शाळुंकेवर नसून तें घागरभर पाणी मावेल अशा एका खळग्यांत आहे. त्या लिंगांतून कधी सिंहनाद उठतात तर कधीं ज्वाळाहि निघतात. गांवाच्या उत्तरेला नीलपर्वत आहे. त्यावर नीलांबिका देवी आहे. या ठिकाणीं परशुरामानें तप केलें. या ठिकाणीं कुशावर्त नांवाचें एक महत्त्वाचें कुंड आहे तिथेंच यात्रेकरू स्नानदानादि धर्मकृत्यें करतात. गांवाबाहेर निवृत्तिनाथांची समाधि आहे. इथल्या ब्रह्मगिरी नांवाच्या पर्वतावर गोदावरीचा उगम झाला आहे. हा डोंगर सुखानें चढतां यावा म्हणून पांचशें पायऱ्या तयार केलेल्या आहेत. ब्रह्मगिरीची उंची समुद्रसपाटीपासून सव्वाचार हजार फूट आहे. तिथून खालचे गौतमालय आणि गंगासागर हे मोठे तलाव फारच गंभीर आणि मनोहर दिसतात. शिवानें जटा आपटल्या आणि गंगेला खाली टाकलें त्या खुणा पठारावरच्या एका शिळेवर दाखवतात दोन उंच

कडे एकमेकांना चिकटतात तिथून गोदावरीचा पहिला प्रवाह खालीं पडतो. खालच्या अंगाला तिचें मंदिर बांधलेलें आहे. नाशिक आणि त्र्यंबकेश्वर यांचा महिमा पुराणांतरीं फार वर्णिलेला आहे. हें क्षेत्र कसें निर्माण झालें त्याची कथा पुढें दिली आहे.

○ ● ●

गणपति हा पार्वतीचा लाडका पुत्र. पार्वती त्याचे लडिवाळ हट्ट पुरवी आणि परोपरीनें त्याचें कौतुक करी. त्यामुळें गणपतीला आईचा लळा फार लागला होता. तो तिच्या अर्ध्या वचनांत असे. तिचें कोणतेंहि काम करायला त्याचा पाय नेहमींच पुढें असे. आईवर त्याची विशेष भक्ति होती तिला थोडेंसें जरी दुःख झालें तरी गणपति मनांत कष्टी होत असे. आपली आई सदैव आनंदी असावी असें त्याला वाटे.

एक दिवस कैलासाच्या शिखरावर इतस्तत: हिंडून जेव्हां तो घरीं आला, तेव्हां पार्वती चिंताक्रांत बसलेली त्याला दिसली. गणपतीला पहातांच तिचे डोळे पाण्यानें भरले आणि मुद्रा अधिकच म्लान झाली. गणपतीला कांहीं उमजेना. तो जवळ गेला आणि तिच्या गळ्यांत हात घालून म्हणाला,

"आई, काय झालं तुला? तूं अशी कष्टी कां? तुझं दुःख काय असेल तें मला सांग. मीं तें चटकन् निवारून टाकतों."

पार्वतीनें त्याचें मस्तक कुरवाळलें आणि त्याला म्हटलें,

"बाळा गजानना, अलीकडे भगवान् शंकर गंगेच्याच नादांत निमग्न असतात. ती त्यांच्या जटाजूटांत ठाण देऊन राहिली आहे. त्यामुळें कैलासपति माझ्याकडे लक्षच देत नाहींत."

"एवढंच ना? मी त्याचा बंदोबस्त करतों. संधि साधून वडिलांचा जटाजूटच मी कापून टाकीन; म्हणजे गंगा आपो-आपच त्यांच्याकडून चालती होईल."

"वेडा आहेस तूं! असलं अघोरी कांहीं करायचं नाहीं. त्यामुळें महादेव खवळतील आणि त्रैलोक्याचं भस्म करायला निघतील."

"ठीक आहे आई. मी नाहीं तसं करणार. कांहीं तरी निराळ्याच युक्तीनें मी गंगेला घालवीन आणि तुझं दुःख निवारीन. मग तर झालं?"

गणपति विचार करीतच तिथून निघाला. काय करावें, कसें करावें अशा विवंचनेंत कांहीं काळ घालवल्यावर त्याला एक नामी युक्ति सुचली. त्यानें वरुणाला बोलावून आज्ञा केली कीं,



जया आणि गणपति

पृथ्वीतलावर सर्वत्र अवर्षण करायचें आणि फक्त एकाच प्रदेशांत पाऊस पाडावयाचा. आणि तो प्रदेश म्हणजे ज्यांत गौतमाचा

आश्रम आहे, असा ब्रह्मगिरीच्या आसपासचा भाग.

गौतम ऋषि, तपस्वी तसाच शेतकरीहि होता. तो त्या प्रदेशांत अनेक ऋषिमुनींच्या साहाय्यानें मोठ्या प्रमाणावर भातशेती करी. त्याच्या शेतांत भरपूर पीक येत असे आणि तो आल्यागेल्या अतिथि-अभ्यागतांना मुक्त हस्तानें अन्नदान करीत असे. वरुणानें गणपतीची आज्ञा पाळली. सगळीकडे अवर्षण पडलें. शेतेंभातें करपून गेलीं. प्यायला पाणीहि मिळेनासें झालें. ऋषींचे यज्ञयाग थांबले. त्यांना आपापले आश्रम सोडण्याची वेळ आला. सगळे देशांताराला निघाले. गौतमाचा आश्रम समृद्ध आहे, त्याचें शेत महामूर पिकत आहे आणि तिथें कोणालाहि दैन्य-दुःखाची झळ लागलेली नाहीं, असें कळल्यावर चहूं बाजूंनी तापसमंडळी त्याच्या आश्रमांत लोटूं लागली गौतमानें कोणालाहि विन्मुख न दवडतां उदार अंतःकरणानें सर्वांची सोय केली.

एवढें मनाजोगतें करून घेतल्यावर गणपतीनें आपणहि ऋषीचें रूप घेतलें आणि तोहि गौतमाच्याच आश्रमांत दाखल झाला. जया नांवाच्या एका दासीला त्यानें शिष्याचें रूप देऊन आपल्याबरोबर घेतलें. या नव्या ऋषीचें आज आणि तेज पाहून सगळे तपस्वी दिपले. आपलें नांव गणेशऋषि असें त्यानें सर्वांना सांगितलें. थोड्याच काळांत गणेशऋषीचें बस्तान तिथें उत्तम बसलें. सर्व लोक त्याच्याच तंत्रानें चालूं लागले. त्यालाच आपला पुढारी समजूं लागले.

गणपति मग पुढच्या उद्योगाला लागला. एक दिवस गौतममुनि सकाळींच स्नानसंध्या उरकून शेतांत गेला होता भात अगदीं कापणीस आलें होतें आणि डुकरें, भेकरें इत्यादि वन्य पशूंपासून त्याची राखण करणें भाग होतें. गौतमऋषि मुखानें वेद म्हणत शेत राखीत बसलेला पाहून गणपतीनें जयेशीं कानगोष्ट कली. तिनें तात्काल गाईचें रूप धारण केलें. थोड्याच वेळांत एक म्हातारी, मोडक्या शिंगांची आणि पाठपोट एक झालेली अशी एक गाय शेतांत उतरून

"वेडा आहेस तूं! असलं अघोरी कांहीं करायचं नाहीं. त्यामुळें महादेव खवळतील आणि त्रैलोक्याचं भस्म करायला निघतील."

"ठीक आहे आई. मी नाहीं तसं करणार. कांहीं तरी निराळ्याच युक्तीनें मी गंगेला घालवीन आणि तुझं दुःख निवारीन. मग तर झालं?"

गणपति विचार करीतच तिथून निघाला. काय करावें, कसें करावें अशा विवंचनेंत कांहीं काळ घालवल्यावर त्याला एक नामी युक्ति सुचली. त्यानें वरुणाला बोलावून आज्ञा केली कीं,



जया आणि गणपति

पृथ्वीतलावर सर्वत्र अवर्षण करायचें आणि फक्त एकाच प्रदेशांत पाऊस पाडावयाचा. आणि तो प्रदेश म्हणजे ज्यांत गौतमाचा

आश्रम आहे, असा ब्रह्मगिरीच्या आसपासचा भाग.


गौतम ऋषि, तपस्वी तसाच शेतकरीहि होता. तो त्या प्रदेशांत अनेक ऋषिमुनींच्या साहाय्यानें मोठ्या प्रमाणावर भातशेती करी. त्याच्या शेतांत भरपूर पीक येत असे आणि तो आल्यागेल्या अतिथि-अभ्यागतांना मुक्त हस्तानें अन्नदान करीत असे. वरुणानें गणपतीची आज्ञा पाळली. सगळीकडे अवर्षण पडलें. शेतेंभातें करपून गेलीं. प्यायला पाणीहि मिळेनासें झालें ऋषीचे यज्ञयाग थांबले. त्यांना आपापले आश्रम सोडण्याची वेळ आला. सगळे देशांताराला निघाले. गौतमाचा आश्रम समृद्ध आहे, त्याचें शेत महामूर पिकत आहे आणि तिथें कोणालाहि दैन्य-दुःखाची झळ लागलेली नाहीं, असें कळल्यावर चहू बाजूनी तापसमंडळी त्याच्या आश्रमांत लोटूं लागली गौतमानें कोणालाहि विन्मुख न दवडतां उदार अंतःकरणानें सर्वांची सोय केली.

एवढें मनाजोगतें करून घेतल्यावर गणपतीनें आपणहि ऋषीचें रूप घेतलें आणि तोहि गौतमाच्याच आश्रमांत दाखल झाला. जया नांवाच्या एका दासीला त्यानें शिष्याचें रूप देऊन आपल्याबरोबर घेतलें. या नव्या ऋषीचें आज आणि तेज पाहून सगळे तपस्वी दिपले. आपलें नांव गणेशऋषि असें त्यानें सर्वांना सांगितलें. थोड्याच काळांत गणेशऋषीचें बस्तान तिथें उत्तम बसलें. सर्व लोक त्याच्याच तंत्रानें चालूं लागले. त्यालाच आपला पुढारी समजूं लागले.

गणपति मग पुढच्या उद्योगाला लागला. एक दिवस गौतममुनि सकाळीच स्नानसंध्या उरकून शेतांत गेला होता भात अगदीं काप-णीस आलें होतें आणि डुकरें, भेकरें इत्यादि वन्य पशूंपासून त्याची राखण करणें भाग होतें. गौतमऋषि मुखानें वेद म्हणत शेत राखीत बसलेला पाहून गणपतीनें जयेशीं कानगोष्ट कली. तिनें तात्काल गाईचें रूप धारण केलें. थोड्याच वेळांत एक म्हातारी, मोडक्या शिंगांची आणि पाठपोट एक झालेली अशी एक गाय शेतांत उतरून

आडव्या जिभेनें घोंसदार लोंब्या खाऊं लागली. गौतमानें तें पाहिलें. त्याला वाटलें, ही रोडकी गाय इथें कुठून उपटली ? तिनें हवा तर पेंढा खावा; पण भात खाण्याचा तिला काय अधिकार? 'हैक, हैक' करून त्यानें तिला हाकलण्याचा प्रयत्न केला; पण ती मुळींच हालेना आणि भात फस्त करायचें सोडीना.

गौतमाला तिचा राग आला. पण गाय अगदींच मरतुकडी



गौतम गाईवर दर्भ फेंकतो

असल्यामुळें दगडधोंडा मारायची सोय नव्हती. त्याच्या हातांत कांहीं दर्भाच्या काड्या होत्या. त्यांतलीच एक उचलून त्यानें ती गाईवर फेंकली. पण दुर्दैव बिचाऱ्या गौतमाचें. त्या दर्भाच्या काडीचा

तो ओझरता स्पर्शहि गाईला सहन झाला नाहीं. ती तिथल्या तिथें धरणीवर कोसळली. गौतमऋषि धावतच तिथें गेला तर गाईनें हातपाय ताणलेले आणि मान टाकलेली. धडधडत्या काळजानें त्यानें तिच्या नाकाशीं हात नेला तों सगळें थंड ! फट् म्हणतां गोहत्या झाली.

गौतमाला अत्यंत दुःख झालें. त्याच्या सगळ्या कळा एकदम मावळल्या. सारें तपस्तेज एकाएकीं लोपलें. गोहत्या म्हणजे केवढें महापातक ! तो खालच्या मानेनें कसाबसा आश्रमांत आला. आपल्या हातून घडलेलें पापकर्म त्यानें सर्वांना निवेदिलें. ऋषीमुनी स्तंभित झाले. ‘ महापाप ’ असे उद्‌गार त्यांच्या तोंडून उमटले. इतके दिवस जो पुण्यपावन आश्रम होता, तीच एकाएकीं पापभूमि, शापभूमि ठरली. यापुढें क्षणभरसुद्धा इथें रहाणें म्हणजे गौतमाच्या पापाचे वांटेकरी होणें, असा विचार त्यांच्या मनांत आला. त्यांनीं आपलीं मृगासनें, कड़ासनें कवळलीं, कमंडलू उचलले आणि ते गौतमाचा आश्रम सोडून जायला निघाले.

सगळे मनी या आपत्प्रसंगीं आपल्याला सोडून जात आहेत, आश्रम सुना होत आहे, हें पाहून गौतमाच्या डोळ्यांतून अश्रुबिंदू टपटपूं लागले. हात जोडून करुणवाणीनें तो त्यांना म्हणाला,

“ भूदेवहो, मला निराधार करून जाऊं नका. मला या पापापासून मुक्त करा. माझा उद्धार करा. कांहीं तरी मला उपाय सांगा. ”

ते पाझरते बोल ऐकून तपस्वी थबकले. सर्वांनीं गणेशऋषीकडे पाहिलें. त्या सर्वांच्या मतें तोच कांहीं तरी उपाय सांगूं शकला असता. गौतमहि गणेशऋषीकडे आर्तभावानें पाहूं लागला. गणेशानें त्याला सांगितलें,

"गौतमा, तूं ब्रह्मगिरीवर बसून त्र्यंबकेश्वराची आराधना कर. तो प्रसन्न झाला म्हणजे त्याच्या जटेंत असलेली गंगा मागून घे. मग त्या गंगेंत विधियुक्त स्नान दान-तर्पण कर. म्हणजे तूं गोहत्येच्या पापांतून मुक्त होशील !"

गौतमानें मग वेळ लावला नाहीं. तो ब्रह्मगिरीवर चढला आणि देहाची क्षिति न बाळगतां उग्र तप करूं लागला. कांहीं दिवस तो वृक्षावरून गळलेलीं पानें भक्षण करी, कांहीं दिवस पाणीच पिऊन राही, तर कांहीं दिवस केवळ वारा पिऊन निराहार दिवस कंठी. दिवसानुदिवस त्याचें तप वाढूं लागलें. गंगेला हें समजलें. तिचें शिवमस्तकावरचें स्थान डळमळूं लागलें. गौतमाकडे जाण्याचा दुर्धर प्रसंग आपणांवर येऊं नये, म्हणून तिनें त्याचा तपोभंग करण्यासाठीं अनेक क्लृप्त्या योजल्या. पण त्यांचा कांहींच उपयोग झाला नाहीं. शेवटीं निर्वाणीचा उपाय म्हणून तिनें जटिका नांवाच्या आपल्या दासीला ब्रह्मगिरीवर पाठवलें.

जटिका तिथें आली ती गौतमपत्नी अहल्येचें रूप घेऊन. तिनें गौतमाची विनवणी सुरू केली. 'मी आश्रमांत एकटी पडलें आहे. मला भय वाटत आहे. सर्व बाजूंनीं आपली दैन्यावस्था आली आहे. तेव्हां तुम्ही कृपावंत होऊन माझ्याबरोबर आश्रमांत चला.' असा तिनें सारखा घोसरा लावला. इतर कोणी नव्हे; तर आपली धर्मपत्नी बोलत आहे, असें समजून गौतमानें डोळे उघडले.

पण थोडा वेळ तिच्याकडे टक लावून पहातांच त्या प्रकारांतलें कपट त्याच्या निदर्शनास आलें. ही आपली पत्नी नसून भलतीच कोणी त्या रूपानें आली आहे, हें लक्षांत येतांच गौतमाच्या क्रोधाचा अंगार फुलला. त्यानें कडाडून तिला म्हटलें,

" दुष्टे, अशा रीतीनें माझं तप मोडायला आलीस काय ? जा नदी होऊन पड !"

गौतमाची ही शापवाणी ऐकून जटिका घाबरली. तिनें त्याच्यापुढें निजरूप प्रगट केलें आणि त्याचे पाय धरले.

" ऋषिश्रेष्ठा, माझ्या अपराधाची क्षमा करा. मला उःशाप द्या. मी गंगेच्या घरची दासी आहें. तिच्या आज्ञेमुळें मला ही नको असलेली गोष्ट करावी लागली."

गौतमाचें दयार्द्र अंतःकरण लगेच विरघळलें.

तो म्हणाला, " ज्यावेळीं भगवान् शंकर प्रसन्न होऊन आपली गंगा इथें वाहवील, त्या वेळीं तूं तिच्यांत मिसळून जा म्हणजे पावन होशील नि उद्धरून जाशील."

नंतर कांहीं कालानें एक दिव्य तेजाचा झोत ब्रह्मगिरीच्या शिखरावर पडला आणि त्यांतून साक्षात् कैलासराणा शिवचंद्रमौळी गौतमापुढें प्रगट झाला. त्याच्या हातांत त्रिशूळ–डमरू होते, मस्तकीं जटाजूट होता आणि त्यांत पार्वतीच्या मनाला व्यग्र करणारी ती गंगाहि होती. गौतमानें त्याला डोळे भरून पाहिलें आणि ' धन्य दिवस उगवला ' अशा हर्षयुक्त भावनेनें साष्टांग प्रणिपात केला.

" गौतमा, ऊठ ! मी तुला प्रसन्न आहें. इष्ट तो वर मागून घे." शिवशंकर बोलला.

" भगवन्, माझ्या हातून गोहत्येचं महापातक घडलं आहे. त्यांतून मुक्त होण्यासाठीं तुमच्या जटेंतली पापहारिणी गंगा मला द्या."

गौतमाला ' बरें ' म्हणून शंकर गंगेला बोलला, " तूं या पर्वतशिखरावर उतर आणि गौतमाला पापमुक्त कर."

गंगेला तें मोठें संकट वाटलें. तिनें निराळाच मुद्दा पुढें केला,

"महादेवा, मी तुमची स्त्री आहे. भक्त झाला म्हणून काय झालें ? त्याला आपली स्त्री द्यायची ? हें काय दान झालें का रीत झाली !"

"तें कांहींहि असो. माझ्या भक्ताचं काम तूं केलंच पाहिजेस."

पण गंगा कांहीं केल्या ऐकेना. ती शिवाच्या जटेंत खोलवर जाऊन बसली. शंकराला क्रोध आला. त्याच्या सर्व अंगप्रत्यंगांतून चैतन्य नुसतें थरथरूं लागलें. सहजच त्याचा एक पाय उचलला आणि चारी भुजा उंच झाल्या. त्यानें तांडव सुरू केलें. 'तत् थै तत् थै' अशा ठेक्यांत पावलें पडूं लागलीं. ब्रह्मगिरि कंपित झाला. भूमीला हादरे बसले. वृक्ष–वल्लींवरचीं फळें–फुलें पटापट गळूं लागलीं. त्याच्या बाजूबंदाचे आणि गळ्यांतले नाग भोवंड येऊन विष ओकूं लागले. सूर्याचें तेज मंद पडलें. आकाशाला तडे जातील कीं काय, असे वाटूं लागलें. गौतम तें पहातां पहातां भ्याला, स्तब्ध झाला. स्वर्गातल्या देवांचीहि आसनें डळमळूं लागलीं. 'महारुद्रा शांत हो' असा स्वर्गांतून दीन आक्रोश उठावला. मग शंकरानें प्रथम गुडघे टेकले, नंतर कोपर टेकले आणि ब्रह्मगिरीच्या शिखरावर आपल्या जटा आपटल्या.

त्यासरशीं जटेंतली गंगा पर्वतावर पडली आणि खालीं झुळझुळूं लागली. त्या दिवशीं माघ शुद्ध दशमी ही तिथि होती आणि भर माध्यान्हाची वेळ होती. कृतयुगाचीं दोन लक्ष वर्षं लोटून गेलीं होतीं. भगवंताचा कूर्म अवतार चालू होता आणि देवगुरु बृहस्पति सिंहराशींत होता.

अशा प्रकारें ब्रह्मगिरीवर गंगा प्रगट झालेली पहातांच स्वर्गांत दुंदुभी वाजूं लागल्या. देवांनीं पुष्पवृष्टि केली. शिवाचा क्रोध शां

झाला. गंगेला गौतमाच्या स्वाधीन करून त्र्यंबकराज शंकर कैलासाला निघून गेला. पार्वतीचें मन प्रसन्न झालें. मातृभक्त गणपतीनें योजलेला कार्यभाग सिद्धीस गेला. मातेची मुखमुद्रा उल्हसित पाहून तो कृतार्थ झाला.

पण नाइलाजानें मनाविरुद्ध ब्रह्मगिरीवर उतरलेली गंगा गौतमाला सुखासुखी उद्धरील, ही गोष्ट शक्य नव्हती. शिवाची पाठ फिरताच ती तिथल्या तिथें गुप्त झाली. गौतमाच्या वांट्याला



गौतम गोदावरीत स्नान करतो

हें सगळें आरशांतलें धन ठरलें. आली ती काय आणि एकदम नाहींशी झाली काय, याचा त्याला अत्यंत खेद झाला. तो तिथेंच खालीं बसला आणि त्या अदृश्य गंगेला मनोभावें प्रार्थू लागला.,

" हे शंकरप्रिये, शंकरानें आपल्या जटेंतून बलात्कारानं काढलं

म्हणून तूं रागावलीस काय ? माते, तूं रागावलीस तर माझं मरणच ओढवलं. माझा उद्धार करायचं सामर्थ्य तुझ्यावांचून दुसऱ्या कोणालाही नाहीं. देवि, कृपा कर. पुन्हां प्रगट हो. तुझा प्रवाह खळाळू दे. त्यांत स्नान करून मला मुक्त होऊं दे."

ही तळमळीची प्रार्थना ऐकल्यावर मग मात्र गंगेला राहवलें नाहीं. ती तिथल्या औदुंबराच्या मुळांत प्रकट झाली. गौतमऋषि हर्षानें उचंबळला. त्यानें आपल्या पत्नीला, शिष्यांना, ऋषिमुनींना सर्वांना बोलवणें धाडलें. सर्वांच्या समक्ष तीन प्रदक्षिणा करून गंगेंत बुडी मारली. तो सतेज होऊन तिच्यांतून बाहेर आला. आपण पापमुक्त झालों म्हणून त्याच्या डोळ्यांतून आनंदाश्रू खळाळले. नंतर तिथें जमलेल्या सर्वांनीं 'हर गंगे' म्हणून तिच्यांत बुड्या मारल्या. गौतमानें खूप दान-धर्म केला आणि गंगेला हात जोडून म्हटलें,

"आजपासून तुझें नांव गोदावरी. तूं इथून पूर्ववाहिनी होऊन सागराला भेटायला जा. सर्वांचं पाप-ताप दूर कर. सर्वांचं दैन्य-दारिद्र्य नष्ट कर. आणि तुझ्या दोन्ही तीरांवर सर्वत्र समृद्धि नांदव."

• • •

# राजर्षि दिवोदास



काशी हें विश्वनाथाचें स्थान. तें उत्तर प्रदेशांत गंगेच्या कांठीं वसलें आहे. भारतांतल्या अत्यंत प्राचीन शहरां-पैकीं काशी हें एक शहर आहे. वेदशास्त्रविद्यांचें माहेरघर अशी याची ख्याति आहे. वैदिक आणि बौद्ध हे धर्म इथून सगळ्या भारतांत पसरले. वारणा व अशी या दोन नद्यांमधील प्रदेशांत हे शहर वसल्यामुळें याला 'वाराणशी' असें दुसरें नांव पडलें आहे. इथें गंगेवर

चाळिसांहून अधिक घाट बांधलेले आहेत. त्यात दशाश्वमेध, मणिकर्णिका, ब्रह्मा, पंचगंगा हे घाट प्रसिद्ध आहेत. इथलें विश्वेश्वराचें मंदिर अहिल्याबाईनें बांधलें आहे विश्वेश्वराखालोखाल इथें काळभैरवाचें मंदिर प्रसिद्ध आहे ज्ञानवापी, पिशाचमोचन इत्यादि कुंडें महत्त्वाचीं आहेत. काशीभोंवतीं जी कांहीं मैलांची प्रदक्षिणा घालावी लागते तिला पंचक्रोशीची यात्रा म्हणतात. पं. मदनमोहन मालवीय यांची बनारस हिंदु युनिव्हर्सिटी इथेंच आहे. काशीनगर दिवोदासानें वसवलें अशी लोककथा आहे. काशींत सर्व देवतांचे वास्तव्य आहे असें समजतात. या देवता दिवोदासाचा पराभव करण्यासाठीं आल्या आणि त्यांत अपयश आल्यामुळें इथेंच कायमच्या राहिल्या. दिवोदासानें ज्या घाटावर दहा अश्वमेध यज्ञ केले, तोच पुढे दशाश्वमेध घाट म्हणून प्रसिद्ध पावला. याच दिवोदासाची कथा पुढें सांगितली आहे.

● ● ●

'राजा कालस्य कारणम्' असें एक अनुभवी सुभाषित आहे. त्याचा अर्थ असा कीं, राजाची वर्तणूक जशी बरी अथवा वाईट असेल, त्याप्रमाणें राज्यांत परिस्थिति निर्माण होते. राजा जर अधर्मानें वागूं लागला, पापी आणि दुराचारी बनला, तर त्या राज्यावर अनेक अनर्थ आणि उत्पात येऊन कोसळतात. तो एकटा अधर्म करितो आणि त्याचीं कडू फळें सर्व जनतेला चाखावीं लागतात.

प्राचीन काळीं एकदां असेंच झालें. पृथ्वीवरचे सर्व राजे नीतिधर्म विसरले, उन्मत्तपणें वागूं लागले आणि त्यामुळें पृथ्वीवर अवर्षण पडलें एक नाहीं, दोन नाहीं तर साठ वर्षे पावसाचा एक थेंबहि पडला नाहीं. प्राणी अन्नपाण्याविना तडफडून मृत्युमुखीं पडूं लागले. पृथ्वींत पाणी कुठें आढळेना. गिरिकपाटेंहि शुष्क झालीं. वनस्पती करपून गेल्या. धरित्री महास्मशान झाली. अन्नच नाहीं तिथें कुठले जपतप, कुठलीं नेमव्रतें आणि कुठले यज्ञयाग! सगळीकडे हाहाकार! सर्वत्र आक्रोश! सगळेंच भयाण!

ब्रह्मदेव हा सृष्टीचा उत्पन्नकर्ता. आपल्या लेंकरांची ही अन्नान्न-दशा आणि हा अकालमृत्यु पाहून त्याला फार दुःख झालें. कांहींतरी उपाय योजून हा सृष्टीचा संहार थांबवलाच पाहिजे असें त्यानें ठरविलें. लगेच हंसावर बसून तो मृत्युलोकीं आला. फिरत फिरत काशींत पोंचला. तिथें गंगेला थोडेसेंच पाणी होतें. त्यांत त्यानें स्नान-संध्या केली. नंतर तो काशीच्या पंचक्रोशींत संचारार्थ निघाला.

वाटेंत त्याला एक कल्पवृक्ष दिसला. त्याच्या तळीं एक तपस्वी शिवशंकराच्या ध्यानांत निमग्न असलेला त्यानें पाहिला. तो वैव-स्वत वंशांतला एक राजर्षि होता. त्याचें नांव रिपुंजय असें होतें. तो किती तरी वर्षें तसाच त्या वृक्षाखालीं ध्यान धरून बसला होता. त्याच्या मुखावर तपस्तेज झळकत होतें. जणूं दुसरा सूर्यच धरणीवर उगवला आहे असें वाटत होतें. त्याला पाहून ब्रह्मदेवाला विचार सुचला. 'आतां यालाच सप्तद्वीपवती पृथ्वीचा राजा करावें. हा धर्मानें प्रजा पाळील. भूगोलावर पुण्य वाढूं लागेल. पाप झुरून झुरून मरेल. आणि मग जगाची आजची अवकळा नष्ट होऊन सर्वत्र सुख, शांति आणि मंगल नांदेल.'

ब्रह्मदेव मग त्याच्याजवळ गेला आणि त्यानें त्याला ध्यानांतून भानावर आणलें रिपुंजय चकित होऊन समोर पहातो, तों साक्षात् सृष्टिकर्ता ब्रह्मा. त्यानें त्या पितामहाला नमस्कार केला. आशी-र्वादासाठीं भुजा उभारून ब्रह्मदेव रिपुंजयाला म्हणाला,

"ही सृष्टि आजपासून मीं तुझ्या हवालीं केली आहे. माझ्या आज्ञेनें तूं हिच्यावर धर्माचें राज्य कर."

रिपुंजयाला अचंबाच वाटला. विधाता येतो काय, आपल्याला जागवतो काय आणि पृथ्वीचें राज्य ओपतो काय. सगळेंच अघटित! त्याला तें रुचलें नाहीं. तो असंतुष्ट शब्दांत ब्रह्म्याला म्हणाला,

" पितामह, माझ्या तपांत विघ्न कां बरं आणलंत ? पृथ्वीवर काय अन्य क्षत्रिय नव्हते ? त्यांच्याकडे जायचं सोडून मजकडे का आलांत ? मी काय राज्य मिळविण्यासाठीं तप करतों असं तुम्हांला वाटलं ? छे: छे: ! मला राज्याची स्वप्नांतसुद्धा अपेक्षा नाहीं. मी शिवाचा भक्त आहें आणि त्याची कृपा मिळावी, एवढ्याच हेतूनें त्याची आराधना करीत आहें. राज्य ही मी आपत्ति समजतों. "

" तुला ती आपत्ति असेल; पण, लोकांना तें वरदान ठरणार आहे. तूं धर्मशील आहेस, पुण्यवंत आहेस. तू राजदंड हातीं धरलास तर लोकांतला अधर्म फिटून धर्म वाढेल आणि त्याच क्षणीं पृथ्वीवरचं अवर्षण संपेल. इथें निरंजनीं ध्यान लावून बसलास तर फक्त तूं एकटा मोक्ष मिळवशील. पण जर लोकांचा शास्ता बनून त्यांना सन्मार्ग दाखवलास तर तुझा उद्धार होईलच; आणि शिवाय जनताहि उद्धरेल. जो स्वत: तरून लोकांना तारतो, तोच खरा मोठा. "

ब्रह्मदेवाच्या या युक्तिवादानें रिपुंजय निरुत्तर झाला. त्यानें विधात्याचें म्हणणें मान्य केलें. मात्र तसें करतांना ब्रह्मदेवाला त्यानें कांहीं अटी घातल्या.

" मी राज्य करीन; पण, तें सार्वभौम असलं पाहिजे. स्वर्गांत जसा देवेंद्र तसा मी या पृथ्वीवर. माझ्या राज्यांत साक्षात् शंकराचीसुद्धां सत्ता चालतां कामा नये. "

ब्रह्मदेवानें त्याच्या या मागणीला तर 'तथास्तु' म्हटलेंच; शिवाय आणखीहि कांहीं वर त्याला आपण होऊन दिले. रिपुंजय इतकीं वर्षें ब्रह्मचारी होता. त्याच्या हातून चांगल्या प्रकारें राज्य चालायचें, तर त्याला एखादी सुलक्षणी, सुस्वभावी राणी मिळवून देणें अवश्य होतें. विचारांतीं शेषाची कन्या अनंगमोहिनी ही रिपुंजयाला सर्वथा अनुरूप असल्याचें त्यानें ठरविलें. शेषाला सांगून ती

कन्या त्याच्या हस्तें रिपुंजयाला अर्पण केली. रिपुंजय गृहस्थाश्रमी झाला. मग सती अरुंधतीला बोलावून तिच्या हस्तें काशींत त्याला राज्याभिषेक करवला. दिवोदास असें त्याचें नवें नांव ठेवलें. काशीतल्या सर्व देवांना स्वर्गांत अन् नागांना पाताळांत रवाना केलें. सर्वांनीं विधात्याची आज्ञा शिरसावंद्य मानली. पण अजून एक मोठीच आसामी काशींत राहिली होती आणि ती म्हणजे देवांचाहि देव असलेला पशुपति शंकर! त्याला काशीक्षेत्रांतून बाहेर काढण्याचें कार्य महाकठीण होतें. विधात्यानें शिवाच्या भोळ्या स्वभावाचा या बाबतींत फायदा घ्यायचें ठरवलें आणि तो एके दिवशी त्याजकडे नम्रपणानें गेला.

सदाशिवानें त्याला उजवीकडे बसवून क्षेमकुशल विचारले. ' आपल्या आशीर्वादानें सर्व काहीं ठीक आहे ' असें उत्तर देऊन ब्रह्मदेवानें शंकराला म्हटलें,

" देवाधिदेव! तुमचं मात्र आज क्षेम दिसत नाहीं. तुम्ही कसल्या तरी विचारांत व्यग्र दिसतां "

" होय. खरं आहे तें. हें काशीक्षेत्र सोडायचं म्हणजे मला संकट वाटतं. पण आज तीच गोष्ट करायची वेळ आली आहे. कौसलद्वीपांत क्षीरसागराच्या तीरावर मंदरगिरि तपश्चर्या करीत बसला आहे. त्याचं तप आतां इतकं वाढलं आहे कीं, त्याला इच्छित वर देणंच भाग त्यासाठीं मला तिकडे जाण्याचा प्रसंग आला आहे. काशीक्षेत्राच्या लोभानें आज जावं, उद्या जावं, अशी चाल-ढकल करतों; पण आतां उशीर लावणं म्हणजे भक्ताचा अंत बघण्यासारखं होईल. "

शिवाचें हें बोलणें ऐकून विधाता मनांतल्या मनांत आनंदला. आपण ' जा ' म्हणायच्या पूर्वींच शंकर काशींतून निघण्याचा विचार करीत आहे, हें त्याला सोन्याहून पिवळें वाटलें. शिवाचा विचार पक्का करण्यासाठीं तो म्हणाला,

"पितामह, माझ्या तपांत विघ्न कां बरं आणलंत ? पृथ्वीवर काय अन्य क्षत्रिय नव्हते ? त्यांच्याकडे जायचं सोडून मजकडे का आलांत ? मी काय राज्य मिळविण्यासाठीं तप करतों असं तुम्हांला वाटलं ? छे: छे: ! मला राज्याची स्वप्नांतसुद्धा अपेक्षा नाहीं. मी शिवाचा भक्त आहें आणि त्याची कृपा मिळावी, एवढ्याच हेतूनें त्याची आराधना करीत आहें. राज्य ही मी आपत्ति समजतों."

"तुला ती आपत्ति असेल; पण, लोकांना तें वरदान ठरणार आहे. तूं धर्मशील आहेस, पुण्यवंत आहेस. तू राजदंड हातीं धरलास तर लोकांतला अधर्म फिटून धर्म वाढेल आणि त्याच क्षणीं पृथ्वीवरचं अवर्षण संपेल. इथें निरंजनीं ध्यान लावून बसलास तर फक्त तूं एकटा मोक्ष मिळवशील. पण जर लोकांचा शास्ता बनून त्यांना सन्मार्ग दाखवलास तर तुझा उद्धार होईलच; आणि शिवाय जनताहि उद्धरेल. जो स्वत: तरून लोकांना तारतो, तोच खरा मोठा."

ब्रह्मदेवाच्या या युक्तिवादानें रिपुंजय निरुत्तर झाला. त्यानें विधात्याचें म्हणणें मान्य केलें. मात्र तसें करतांना ब्रह्मदेवाला त्यानें कांहीं अटी घातल्या.

"मी राज्य करीन; पण, तें सार्वभौम असलं पाहिजे. स्वर्गांत जसा देवेंद्र तसा मी या पृथ्वीवर. माझ्या राज्यांत साक्षात् शंकराचीसुद्धां सत्ता चालतां कामा नये."

ब्रह्मदेवानें त्याच्या या मागणीला तर 'तथास्तु' म्हटलेंच; शिवाय आणखीहि कांहीं वर त्याला आपण होऊन दिले. रिपुंजय इतकीं वर्षें ब्रह्मचारी होता. त्याच्या हातून चांगल्या प्रकारें राज्य चालायचें, तर त्याला एखादी सुलक्षणी, सुस्वभावी राणी मिळवून देणें अवश्य होतें. विचारांतीं शेषाची कन्या अनंगमोहिनी ही रिपुंजयाला सर्वथा अनुरूप असल्याचें त्यानें ठरविलें. शेषाला सांगून ती

कन्या त्याच्या हस्तें रिपुंजयाला अर्पण केली. रिपुंजय गृहस्थाश्रमी झाला. मग सती अरुंधतीला बोलावून तिच्या हस्तें काशींत त्याला राज्याभिषेक करवला. दिवोदास असें त्याचें नवें नांव ठेवलें. काशीतल्या सर्व देवांना स्वर्गात अन् नागांना पाताळांत रवाना केलें. सर्वांनीं विधात्याची आज्ञा शिरसावंद्य मानली. पण अजून एक मोठीच आसामी काशींत राहिली होती आणि ती म्हणजे देवांचाहि देव असलेला पशुपति शंकर! त्याला काशीक्षेत्रांतून बाहेर काढण्याचें कार्य महाकठीण होतें. विधात्यानें शिवाच्या भोळ्या स्वभावाचा या बाबतींत फायदा घ्यायचें ठरवलें आणि तो एके दिवशी त्याजकडे नम्रपणानें गेला.

सदाशिवानें त्याला उजवीकडे बसवून क्षेमकुशल विचारले. 'आपल्या आशीर्वादानें सर्व कांहीं ठीक आहे' असें उत्तर देऊन ब्रह्मदेवानें शंकराला म्हटलें,

"देवाधिदेव! तुमचं मात्र आज क्षेम दिसत नाहीं. तुम्ही कसल्या तरी विचारांत व्यग्र दिसतां."

"होय. खरं आहे तें. हें काशीक्षेत्र सोडायचं म्हणजे मला संकट वाटतं. पण आज तीच गोष्ट करायची वेळ आली आहे. कौसलद्वीपांत क्षीरसागराच्या तीरावर मंदरगिरि तपश्चर्या करीत बसला आहे. त्याचं तप आतां इतकं वाढलं आहे कीं, त्याला इच्छित वर देणंच भाग त्यासाठीं मला तिकडे जाण्याचा प्रसंग आला आहे. काशीक्षेत्राच्या लोभानें आज जावं, उद्या जावं, अशी चाल-ढकल करतों; पण आतां उशीर लावणं म्हणजे भक्ताचा अंत बघण्यासारखं होईल."

शिवाचें हें बोलणें ऐकून विधाता मनांतल्या मनांत आनंदला. आपण 'जा' म्हणायच्या पूर्वींच शंकर काशींतून निघण्याचा विचार करीत आहे, हें त्याला सोन्याहून पिवळें वाटलें. शिवाचा विचार पक्का करण्यासाठीं तो म्हणाला,

" कैलासनाथ ! तुम्हांला जाणंच भाग. भक्ताची उपेक्षा झाली, तर देवाचं ब्रीद्र तें काय उरलं ! तुम्ही ताबडतोब निघा. मंदरगिरीला वर देऊन कृतार्थ करा."

शंकर निघाला तेव्हां त्याच्याबरोबर ब्रह्मदेवालाहि जावें लागलें. त्यांना मंदरगिरी ध्यानमग्न दिसला. 'नगराजा, ऊठ ! मी तुला वर देण्यासाठीं आलों आहें.' ही शिवाची मेघगंभीर वाणी ऐकून मंदरगिरीनें ध्यान विसर्जन करून शिवाला साष्टांग नमस्कार घातला. शिवानें त्याला हृदयाशीं धरून म्हटलें,

" तुला हवा असेल तो वर माग ! "

" देवाधिदेव ! तुमच्या मस्तकावर जसा चंद्र, तसे तुम्हीं माझ्या मस्तकावर रहावं एवढीच इच्छा आहे."

शिव क्षणभर स्तब्ध झाला. मंदराला इच्छित वर देणें म्हणजे काशीला अंतरणें, असाच तो पेंच होता. त्याची ती मुद्रा स्तब्ध पाहून ब्रह्मदेव हळूच त्याला बोलला,

" तुम्ही मंदराचं मागणं मान्य करा. काशीचा कारभार चालवण्यासाठीं मी दिवोदासाची योजना केली आहे. तो धर्मावतार आहे. त्याच्या छायेखालीं सर्व जग सुख, शांति आणि समृद्धि उपभोगील."

शिवानें नाइलाजानें 'तथास्तु' म्हटलं. त्यानें मंदरगिरीच्या मस्तकावर समाधीसाठीं आसन मांडलें. सर्व देवांचा परिवार त्याच्या भोंवतीं जमला ब्रह्मदेवहि आपला सत्यलोक सोडून तिथेंच राहिला दिवोदासाची जगावर अनिर्बंध सत्ता प्रस्थापित झाली. जगांत त्याच्या वरचढ कोणी राहिलें नाहीं.

राज्याभिषेक झाल्यावर दिवोदासानें एकवार पृथ्वीवर दृष्टिक्षेप केला. तिथें जें भयाण दृश्य दिसलें, तें पाहून त्याच्या अंतरांत करुणेचा सागर उचंबळला. धरित्री तापली होती. पाणी आटलें

लोक मरण्याच्या पंथाला लागले होते. वरुणानें वर्षानुवर्ष
र अवकृपा केली होती. जगांत कांहीं त्राणच उरलें नव्हतें.
नाशीं म्हणाला, ' ठीक आहे! '

ानें मग स्वतःच पर्जन्य व्हायचें ठरवलें. आपल्या हृदयाचें
श त्यानें अतिविशाल केलें. त्यांत दयेचे मेघ निर्मिले. करु-
ाणी भरून ते जड आणि सजल केले. मनाच्या वाऱ्याला
सर्वत्र वाहून न्यायला लावलें. वरुणाच्या ज्या शक्ती त्या
आपल्या अंतरांत जागृत केल्या, वाढवल्या आणि त्यानेंच
थ्वी जलमय करून टाकली.

थ्वी निवली. माणसाची तडफड थांबली. नद्या तुडुंब भरल्या.
शय भरून ओसंडले. शेतकऱ्यांनीं पेरण्या केल्या. आधीं
भाजून निघालेल्या जमिनींत महामूर धान्य पिकलें. सगळी-
सुकाळ झाला. दैन्य कोशांत लपलें. दारिद्र्य उडून गेलें.
वर पुनश्च यज्ञयाग सुरू झाले. हव्यकव्यें उदारपणें चालू
ीं. लोकांना दिवोदास प्रतिपरमेश्वर झाला. लोक त्याचेंच
घेऊं लागले. त्याचीच जपमाळ ओढूं लागले. कोणाच्या
पापाचा अंकुरहि उगवेना. चारी वर्ण आपापला धर्म संभा-
ामानें आणि सहकार्यानें वागूं लागले. सुखाची देवाणघेवाण
ागले. जें जें घातक, अभद्र, अमंगल तें तें विलयाला गेलें
जें जें शुभ, सुंदर, मंगल तें तें वाढीस लागलें. वर्ष
ासारखें वाटूं लागलें. दिवस क्षणासारखा झाला. आला
अन् गेला केव्हां तेंच कळेना. दिवोदास प्रजेच्या मनांत
सारखा भरला आणि भरूनहि उरला. त्याच्या धवल यशाचे
दुमदुमूं लागले.

त्यांचा ध्वनि पृथ्वीवरच्या लोकांना उत्साहजनक वाटत
तरी वर स्वर्गांत इंद्राच्या मात्र त्यानें कानठळ्या बसवल्या.

दिवोदासानें पृथ्वीचाच स्वर्ग बनवला, देवलोकाचें माहात्म्य संपुष्टांत आणलें, हें त्या मत्सरग्रस्त इंद्राला सहन होईना. तो अहर्निश त्याच चिंतेनें तळमळूं लागला. त्याला अप्सरांचें नृत्यगायन गोड वाटेना आणि अमृताचीहि चव लागेना. चंदनाची उटीहि त्याचें सर्वांग जाळूं लागली. दिवोदासाचा द्वेष अंतरांत मावेना अशी परिस्थिति झाली, तेव्हां त्यानें देवगुरु बृहस्पतीला बोलावून सांगितलें,

"कांहीं तरी युक्ति करून दिवोदासाचा पाडाव करा. त्याला राज्यभ्रष्ट करून कीर्तिशिखरावरून खालीं ओढा. हें काम झालंच पाहिजे. तूर्त अन् ताबडतोब !"

देवगुरु गंभीर झाला. इंद्राच्या मत्सरी स्वभावाची त्याला कींव आली. त्याचें हें बोलणें, वागणें त्याच्या अत्युच्च स्थानाला शोभण्याजोगें नव्हतें. त्यानें त्याला भाडभीड न ठेवतां स्वच्छ शब्दांत सांगितलें,

" देवेंद्रा ! ही गोष्ट होणं नाहीं. तो राजा असला तरी विलासी नाहीं. दंडधारी असला तरी जुलमी नाहीं. तो कर घेतो; पण लोकांच्याच बऱ्यासाठीं. त्यानें प्रजेचं मन मोठं केलं आहे. तिची नैतिक उंची वाढविली आहे. पापापासून तिला पराङ्मुख केलं आहे. आणि इतकं करूनहि लोकमताला योग्य तो मान देऊन तो आपलं राज्य चालवीत आहे. जो राजा प्रजेच्या हृदयसिंहासनावर आरूढ झाला, त्याला उखडून टाकणं ही अशक्य गोष्ट आहे. देवेंद्रा ! वेन राजा प्रजेला असह्य होतांच तो तिच्या नुसत्या हुंकारानें गतप्राण झाला आणि त्याचाच पुत्र पृथु राजा प्रजेला हवासा वाटल्यामुळें यावज्जीव टिकला, ही गोष्ट तूं विसरलास काय ? तेव्हां तूं हा क्षुद्र भाव सोडून दे आणि शक्य तर त्या पुण्यवंत भूपतीशीं स्नेह जोड."

पण इंद्राला तें कसें पटावें ! त्यानें देवगुरूचा नाद सोडला आणि स्वतःची बुद्धि चालू केली इंद्राचा स्वभावच असा कीं, कुठल्याहि कार्याला आपण पुढें न होतां दुसऱ्याला तोंडीं द्यायचें. बरेंवाईट झालें तर दुसऱ्याचें होवो आणि आपणाला तोशीस न लागो ! त्यानें अग्नीला पुढें बोलावून म्हटलें,

" दिवोदासानें सर्व देवाचा पराभव केला आहे. तेव्हां तुला आतां त्याच्या राज्यांत राहाण्याची गरज नाहीं. पृथ्वीवरची तुझी मूर्ति तूं काढून घे. "

अग्नि म्हणाला, " जशी देवेंद्राची आज्ञा ! " त्यानें आपली मूर्ति पृथ्वीवरून वर ओढून घेतली. सगळ्या पृथ्वीवरचा अग्नि एका क्षणांत नष्ट झाला. यज्ञकुंडांतल्या ज्वाळा विझल्या. परसे आणि धुम्या शांत झाल्या. चुली थंड पडल्या. होमहवनें तर थांबलींच; पण अन्न शिजवायलाहि कांहीं साधन उरलें नाहीं. अग्नि गेला म्हणजे सगळ्या जगाचा उबाराच गेला. जीवनांतलें तेजच संपुष्टांत आलें. प्राणिमात्राचे चलनवलनादि व्यवहारच बंद पडण्याची वेळ आली. कांहीं प्रमुख मंडळी तात्बडतोब दिवोदासाकडे धावली आणि त्यांनीं जगाची हाकाटी त्याच्या कानावर घातली. ती ऐकून दिवोदास म्हणाला,

" मी तुमचा राजा. सर्व प्रजाजन माझ्या आज्ञेंत वागत असूनहि तिला दुःख भोगण्याची वेळ यावी, ही गोष्ट मी माझ्या राज-पदवीला लांछनास्पद समजतों. पण तुम्ही चिंता करूं नका. मी तुमचा अग्नि होईन. मीच तुमच्या चुलींत जळेन आणि तुमचं अन्न शिजवीन. मीच तुम्हांला उष्णता देईन आणि मीच तुमच्या आहुतीहि ग्रहण करीन. इंद्रानें अग्नीला पृथ्वीवरून नष्ट करून आपल्याच पायावर धोंडा घालून घेतला आहे. पृथ्वीवरचीं होमहवनं थांबलीं, तर आपल्या आधीं देवच उपाशी पडतील. इंद्र माझ्याशीं

वैर धरतो आहे. पण मी त्याचं वैर न करतां माझा मार्ग काढीन."

आलेल्या लोकांना परत धाडून दिवोदास ध्यानस्थ बसला. त्यानें आपल्या पंचप्राणांतल्या तेजाला फुंकर घातली. तें वाढतां वाढतां वाढू लागलें. तो स्वयमेव अग्निरूप बनला. तें तेज त्यानें दशदिशांना फेकलें. जिथें जिथें गरज होती तिथें तिथें तें नेमकें गेलें. यज्ञकुंडांत ज्वाळा उठली आणि तिनें आहुति ग्रहण केली. चुलींत विस्तव सांदुकला अन् एकाएकीं वरच्या भांड्यांतलें अन्न शिजूं लागलें. लोकांचीं गात्रें थंडीनें गोठूं लागलीं होतीं त्यांत एकाएकीं चैतन्य भरलें. सर्वांनीं सर्वत्र दिवोदासाचा जयजयकार केला. जनांत त्याच्याविषयीं प्रेमादर शतपटींनीं वाढला. दिवोदासाचा आत्मविश्वासहि वृद्धिगत झाला. एकटा सूर्यनारायण सोडून बाकीच्या सगळ्या देवांना त्यानें भूमंडळ सोडायला लावलें. सूर्याविषयीं दिवोदासाला आदर होता. कारण तो त्याचा मूळ पूर्वज होता. विश्वाच्या कल्याणासाठीं निरपेक्षपणें अखंड जळत, तापत राहणें हा सूर्याचा धर्म त्यानें आपल्या जीवनाचा आदर्श ठरवला होता.

तो आत्मसामर्थ्याच्या बळावर जगाचे व्यवहार चालवूं लागला. इंद्राची चिंता दिवसेंदिवस बळावत चालली. त्यानें अनेक देवदेवतांना एकामागून एक असें पृथ्वीवर धाडलें. 'कांहीहि कर; पण दिवोदासाला सत्त्वापासून, धर्मापासून चळवा. तो जरा जरी सत्त्वभ्रष्ट झाला तरी मी त्याचा लीलेनें पराभव करीन.' असें तो सर्वांना सांगे. अशा रीतीनें इंद्राचें कार्य साधण्यासाठीं देवदेवता, अप्सरा, योगिनी अशी अनेक मंडळी स्वर्गांतून खालीं उतरली. पण दिवोदासाचें वाईट चिंतून जे जे काशींत आले, ते ते परत गेलेच नाहींत. दिवोदासाच्या कल्याणकारी तेजानें ते दिपले आणि आपला पराभव मान्य करून काशींतच खालच्या मानेनें राहिले. अशा प्रकारें अनेक वर्षें लोटलीं.

आणि इकडे मंदराचळावर साक्षात् शंकरहि अस्वस्थ झाला.



ब्रह्मा-शिव यांची चिंता

त्याला काशीचा वियोग सहन होईना. जोंपर्यंत दिवोदास काशी-क्षेत्रांत राज्य करीत आहे, तोंपर्यंत आपण असेच परदेशी राहणार, असें त्याला वाटलें. त्याला सत्त्वभ्रष्ट करून खालीं ओढण्यासाठीं, देवेंद्र जे प्रयत्न करीत होता, ते शंकर मंदरगिरीवरून पहात होता. पण ते सगळे व्यर्थ ठरलेले पाहून त्याची अस्वस्थता दिवसेंदिवस वाढूं लागली. ब्रह्मदेवाला भय वाटूं लागले, कीं आपण या सगळ्या

वैर धरतो आहे. पण मी त्याचं वैर न करतां माझा मार्ग काढीन."

आलेल्या लोकांना परत धाडून दिवोदास ध्यानस्थ बसला. त्यानें आपल्या पंचप्राणांतल्या तेजाला फुंकर घातली. तें वाढतां वाढतां वाढूं लागलें. तो स्वयमेव अग्निरूप बनला. तें तेज त्यानें दशदिशांना फेकलें. जिथें जिथें गरज होती तिथें तिथें तें नेमकें गेलें. यज्ञकुंडांत ज्वाळा उठली आणि तिनें आहुति ग्रहण केली. चुलींत विस्तव सांदुकला अन् एकाएकीं वरच्या भांड्यांतलें अन्न शिजूं लागलें. लोकांचीं गात्रें थंडीनें गोठूं लागलीं होतीं त्यांत एकाएकीं चैतन्य भरलें. सर्वांनीं सर्वत्र दिवोदासाचा जयजयकार केला. जनांत त्याच्याविषयीं प्रेमादर शतपटींनीं वाढला. दिवोदासाचा आत्मविश्वासहि वृद्धिंगत झाला. एकटा सूर्यनारायण सोडून बाकीच्या सगळ्या देवांना त्यानें भूमंडळ सोडायला लावलें. सूर्याविषयीं दिवोदासाला आदर होता. कारण तो त्याचा मूळ पूर्वज होता. विश्वाच्या कल्याणासाठीं निरपेक्षपणें अखंड जळत, तापत राहणें हा सूर्याचा धर्म त्यानें आपल्या जीवनाचा आदर्श ठरवला होता.

तो आत्मसामर्थ्याच्या बळावर जगाचे व्यवहार चालवूं लागला. इंद्राची चिंता दिवसेंदिवस बळावत चालली. त्यानें अनेक देवदेवतांना एकामागून एक असें पृथ्वीवर धाडलें. 'कांहीहि कर; पण दिवोदासाला सत्त्वापासून, धर्मापासून चळवा. तो जरा जरी सत्त्वभ्रष्ट झाला तरी मी त्याचा लीलेनें पराभव करीन.' असें तो सर्वांना सांगे. अशा रीतीनें इंद्राचें कार्य साधण्यासाठीं देवदेवता, अप्सरा, योगिनी अशी अनेक मंडळी स्वर्गांतून खालीं उतरली. पण दिवोदासाचें वाईट चिंतून जे जे काशींत आले, ते ते परत गेलेच नाहींत. दिवोदासाच्या कल्याणकारी तेजानें ते दिपले आणि आपला पराभव मान्य करून काशींतच खालच्या मानेनें राहिले. अशा प्रकारें अनेक वर्षें लोटलीं.

आणि इकडे मंदराचळावर साक्षात् शंकरहि अस्वस्थ झाला.



ब्रह्मा-शिव यांची चिंता

त्याला काशीचा वियोग सहन होईना. जोंपर्यंत दिवोदास काशी-क्षेत्रांत राज्य करीत आहे, तोंपर्यंत आपण असेच परदेशीं राहणार, असें त्याला वाटलें. त्याला सत्त्वभ्रष्ट करून खालीं ओढण्यासाठीं, देवेंद्र जे प्रयत्न करीत होता, ते शंकर मंदरगिरीवरून पहात होता. पण ते सगळे व्यर्थ ठरलेले पाहून त्याची अस्वस्थता दिवसेंदिवस वाढूं लागली. ब्रह्मदेवाला भय वाटूं लागले, कीं आपण या सगळ्या

बनावाचें मूळ कारण म्हणून आपल्यावरच शिवाचा राग होणार नाहीं ना ? तो आपल्यालाच शाप देऊन मोकळा होणार नाहीं ना ? विषाची परीक्षा पहाणें बरें नव्हे. आपणच स्वतः काशीत जावें आणि दिवोदासाला सत्त्वभ्रष्ट करावें. पृथ्वीवर धर्म आतां आपल्या पायांनीं चालूं लागला आहे. तेव्हां दिवोदासाला आतां स्वर्गांत पाठवायला हरकत नाहीं.

विधाता ब्राह्मणाच्या वेषानें काशींत आला. त्यानें दिवोदासाची भेट घेतली त्यानें विचारलें, 'काय आज्ञा आहे ?' ब्राह्मण म्हणाला, 'काशींत एक अश्वमेध करावा अशी इच्छा आहे.' त्यावर दिवोदास बोलला, 'एक कां ? दहा करा.' ब्राह्मण बोलला, 'फार उत्तम. तुम्ही दहा अश्वमेधांचे उदक सोडा.'

दिवोदासानें दुसऱ्याच क्षणीं उकद सोडले. ब्रह्मदेव हर्षित झाला. त्याला वाटलें की आतां याचें न्यून सापडलें. त्यानें मग एक कपट रचलें. अश्वमेध यज्ञाला ज्या ज्या वृक्षांच्या समिधा आवश्यक, ते ते सर्व वृक्ष अदृश्य केले. समिधांसाठीं पाठविलेले दूत हात हालवीत परत आले. यज्ञांचा संकल्प तर सोडलेला आणि समिधा तर नाहींत. हीहि कांहीं तरी देवांची कुटिल कारवाई आहे असें त्याला वाटलें. त्यानें मग ध्यान धरून मंत्र जपला आणि चारी दिशांना जलप्रोक्षण केलें. तत्क्षणी ते वृक्ष त्या त्या ठिकाणीं दिसू लागले. मग त्यानें त्यांच्या समिधाचे भारे आणवले. गंगेच्या घाटावर मोठा थोरला मंडप घातला. हजारों ब्राह्मण बोलावले आणि दहाहि यज्ञ सर्वांगीं परिपूर्ण केले. मग ब्राह्मणाचे रूप घेतलेल्या ब्रह्मदेवाला विचारलें, 'द्विजश्रेष्ठा ! तुझी इच्छा पूर्ण झाली ना ?'

ब्रह्मदेव लाजला. राजाचें सत्त्वहरण होण्याच्या ऐवजीं त्याचेंच सत्त्व गेलें होतें. त्याला आपल्या लोकीहि जावेंसें वाटेना आणि

मंदराचळावर जाऊन शिवालाहि तोंड दाखवावेंसें वाटेना. तो मग त्याच घाटावर शिवलिंग स्थापून राहिला. त्यानें मनाशीं म्हटलें कीं 'शिव आतां स्वत:च्याच सामर्थ्यावर काशींत येवो !'

ब्रह्मदेवाचा हा वृत्तांत शंकराला समजला. सृष्टिकर्ता जिथें विफल होतो, तिथें दुसऱ्या कोणाचें काय चालणार, म्हणून शिवाच्या कळा म्लान झाल्या. त्यामुळें पार्वतीचेंहि मन उद्विग्न झालें. त्यांच्या संसारांत एक प्रकारच्या निराशेनें ठाण मांडलें. गणपतीला तो सगळा विषण्ण देखावा सहन होईना. त्यानें पित्याच्या पुढें उभें राहून म्हटलें, कीं 'मी एवढा मोठा तुमचा पुत्र असतांना तुम्ही निष्कारण चिंता कां करतां ? मला पाठवा. मी दिवोदासाला काशींतून दूर करूनच परत येईन.' शिवानें त्याला आज्ञा दिली आणि 'यशवंत हो' असा आशीर्वादहि दिला.

तो तात्काळ निघून काशींत आला. प्रथम त्यानें मणिकर्णिकेचे स्नान केलें आणि थोडा वेळ चिंतन करून एकंदर कार्याची रूप-रेखा ठरवली. मग त्यानें एका वृद्ध ब्राह्मणाचें रूप घेतलें. नंतर हातांत नक्षत्रपट घेऊन तो ज्योतिषी या नात्यानें घरोघर हिंडूं लागला. लोक त्याला नाना प्रश्न विचारीत आणि हा त्यांचीं अचूक उत्तरें देई. एखादा माणूस अविश्वास दाखवूं लागला, तर हा त्याच्या मनांतल्या गोष्टी भडाभड बोलूं लागे. तो सांगे तीं भविष्यें तंतोतंत उतरत. शिवाय तो स्वप्नांचा अर्थहि सांगे आणि आज रात्री कोणतीं स्वप्नें पडतील तेंहि सांगे. एखाद्याला म्हणावें, 'आज स्वप्नांत तुझें घर जळेल.' दुसऱ्याला सांगावें, 'चोर तुझें घर लुटतील.' तिसऱ्याला बोलावें, 'तुझ्या प्रिय व्यक्तीचा वियोग होईल.' असें आधीं स्वप्न सांगायचें आणि रात्रीं आपल्या मायेनें तें त्या त्या व्यक्तींना दाखवायचें. त्यामुळें ब्राह्मणरूपी

गणपतीवर लोकांचा विश्वास बसला. सगळ्या काशीनगरीला त्या ज्योतिष्याचें वेड लागलें.

ही वार्ता राजवाड्यांत पोंचायला वेळ लागला नाहीं. दिवोदासाच्या राणीनें ब्राह्मणाला बोलावणें धाडलें. ब्राह्मण त्या दिवसाची वाट पहात होता. तो राजवाड्यांत गेला. राणीनें त्याची पूजा करून त्याला दक्षिणाहि बरीच दिली. त्यानें कांहीं खुणेच्या गोष्टी सांगितल्या त्या राणीला पटल्या. मग तो निघून आला. त्या रात्रीं त्यानें राणीला एक वाईट स्वप्न दाखवलें. दुसऱ्या दिवशीं तो राजवाड्यांत येतांच राणी त्याला सांगू लागली,

"रात्रीं मला एक वाईट स्वप्न पडलं. मी घाबरलें, दचकून उठलें. नगराबाहेर परचक्र आलं आहे. शिवमंदिराचे कळस खचले आहेत. पताकांचे दांडे मोडले आहेत. सुवासिनी स्त्रिया कपाळ पिटून रडत आहेत. माझा थोरला मुलगा म्हणजे युवराज घोड्यावरून दौडत असतां खालीं कोसळून मरण पावला आहे....मी भयभीत झालें आहे. काय या स्वप्नाचा अर्थ ? कृपा करून माझं समाधान करा."

त्यावर त्या वृद्ध ब्राह्मणानें चर्या गंभीर केली. डोळे अर्धवट मिटून तो कांहीं वेळ स्तब्ध बसला अन् मग म्हणाला, "हें स्वप्न युवराजाला चांगलं आहे; पण तुम्हां उभयतांना मात्र ठीक नाहीं. याचं प्रत्यंतर थोड्याच अवधींत येईल. याहून मी कांहीं विशेष बोलूं शकत नाहीं. जर राजाची भेट झाली तर त्या वेळीं सगळा खुलासा करीन."

गणपति निघून गेला आणि राणीनें दिवोदासाकडे जाऊन धरला. 'नगरांत एक भविष्य सांगणारा ब्राह्मण आला ? सूर्यासारखा तेजस्वी आहे. त्याला वाचासिद्धि आहे. तो तें खरं उतरतं. तुम्ही एकवार त्या अवश्य दर्शन घ्या.

राणीच्या आग्रहाला राजा कबूल झाला. त्यानें ब्राह्मणाला बोलावणें धाडलें. तो येत असलेला दिसतांच राजा सिंहासनावरून उतरून त्याला सामोरा गेला. उच्चासनावर बसवून त्यानें त्याची षोडशोपचारें पूजा केली. मग विचारलें, कीं ' कुठून येणं झालं अन् कुठं जायचं ?' त्यावर तो ब्राह्मणरूपी गणपति म्हणाला,

" नेहमीं फिरत राहणारा असा मी ब्राह्मण आहें. माझा स्वर्ग, मृत्यु आणि पाताळ या तिन्ही लोकांत संचार असतो. राजा, तुझी कीर्ति ऐकली म्हणून या काशीनगरींत आलों. मला दान नको, दक्षिणा नको, कांहीं नको. तुझी भेट झाली हाच मीं मोठा लाभ समजतों."

दिवोदास त्याच्या भाषणानें प्रसन्न झाला. त्यानें नम्रपणें आपल्या राज्यपद्धतीबद्दल त्याला विचारलें; तेव्हां गणपति बोलला,

" सप्तद्वीपांचं राज्य तूं न्यायानें आणि धर्मानें चालवलं आहेस. तुझी प्रजा अत्यंत सुखी आहे. अष्टदिक्पालांचं एकवटलेलं सामर्थ्यं तुझ्या बाहूंत वास्तव्य करतं. मी तुला एक भविष्य सांगतों. थोड्याच दिवसांत साक्षात् वैकुंठाधिपति विष्णु तुला दर्शन देईल. तूं त्याच्या आज्ञेप्रमाणें वाग. त्यांतच तुझं शाश्वत कल्याण आहे."

एवढें बोलून गणपति निघून गेला. त्या क्षणापासून दिवोदासाच्या मनावर एक निराळाच परिणाम घडून आला. त्याला आपलें ऐश्वर्य आणि राजभोग मिथ्या वाटूं लागले. त्यानें श्रीहरीच्या दर्शनाचा ध्यास घतला. तो सोनियाचा दिवस कधीं उगवतो; याची तो वाट पाहूं लागला. त्यानें ब्राह्मणरूपी गणपतीला पुन्हा बोलावणें धाडलें आणि तो आल्यावर उत्कंठेनें विचारलें, कीं ' मला कधीं दर्शन होणार तें निश्चित सांगा. '. गणपतीनें नक्षत्रपट उलगडून थोडा वेळ चिंतन केल्यासारखें दाखवलें आणि म्टलें

गणपतीवर लोकांचा विश्वास बसला. सगळ्या काशीनगरीला त्या ज्योतिष्याचें वेड लागलें.

ही वार्ता राजवाड्यांत पोंचायला वेळ लागला नाहीं. दिवोदासाच्या राणीनें ब्राह्मणाला बोलावणें धाडलें. ब्राह्मण त्या दिवसाची वाट पहात होता. तो राजवाड्यांत गेला. राणीनें त्याची पूजा करून त्याला दक्षिणाहि बरीच दिली. त्यानें कांहीं खुणेच्या गोष्टी सांगितल्या त्या राणीला पटल्या. मग तो निघून आला. त्या रात्रीं त्यानें राणीला एक वाईट स्वप्न दाखवलें. दुसऱ्या दिवशीं तो राजवाड्यांत येतांच राणी त्याला सांगू लागली,

" रात्रीं मला एक वाईट स्वप्न पडलं. मी घाबरलें, दचकून उठलें. नगराबाहेर परचक्र आलं आहे. शिवमंदिराचे कळस खचले आहेत. पताकांचे दांडे मोडले आहेत. सुवासिनी स्त्रिया कपाळ पिटून रडत आहेत. माझा थोरला मुलगा म्हणजे युवराज घोड्यावरून दौडत असतां खालीं कोसळून मरण पावला आहे....मी भयभीत झालें आहे. काय या स्वप्नाचा अर्थ ? कृपा करून माझं समाधान करा. "

त्यावर त्या वृद्ध ब्राह्मणानें चर्या गंभीर केली. डोळे अर्धवट मिटून तो कांहीं वेळ स्तब्ध बसला अन् मग म्हणाला, " हें स्वप्न युवराजाला चांगलं आहे; पण तुम्हां उभयतांना मात्र ठीक नाहीं. याचं प्रत्यंतर थोड्याच अवधींत येईल. याहून मी कांहीं विशेष बोलूं शकत नाहीं. जर राजाची भेट झाली तर त्या वेळीं सगळा खुलासा करीन. "

गणपति निघून गेला आणि राणीनें दिवोदासाकडे जाऊन घरला. ' नगरांत एक भविष्य सांगणारा ब्राह्मण आला … सूर्यासारखा तेजस्वी आहे. त्याला वाचासिद्धि आहे. तो तें खरं उतरतं. तुम्ही एकवार त्या अवश्य दर्शन घ्या.

राणीच्या आग्रहाला राजा कबूल झाला. त्यानें ब्राह्मणाला बोलावणें धाडलें. तो येत असलेला दिसतांच राजा सिंहासनावरून उतरून त्याला सामोरा गेला. उच्चासनावर बसवून त्यानें त्याची षोडशोपचारें पूजा केली. मग विचारलें, कीं 'कुठून येणं झालं अन् कुठं जायचं ?' त्यावर तो ब्राह्मणरूपी गणपति म्हणाला,

" नेहमीं फिरत राहणारा असा मी ब्राह्मण आहें. माझा स्वर्ग, मृत्यु आणि पाताळ या तिन्ही लोकांत संचार असतो. राजा, तुझी कीर्ति ऐकली म्हणून या काशीनगरींत आलों. मला दान नको, दक्षिणा नको, कांहीं नको. तुझी भेट झाली हाच मीं मोठा लाभ समजतों."

दिवोदास त्याच्या भाषणानें प्रसन्न झाला. त्यानें नम्रपणें आपल्या राज्यपद्धतीबद्दल त्याला विचारलें; तेव्हां गणपति बोलला,

" सप्तद्वीपांचं राज्य तूं न्यायानें आणि धर्मानें चालवलं आहेस. तुझी प्रजा अत्यंत सुखी आहे. अष्टदिक्पालांचं एकवटलेलं सामर्थ्य तुझ्या बाहूंत वास्तव्य करतं. मी तुला एक भविष्य सांगतों. थोड्याच दिवसांत साक्षात् वैकुंठाधिपति विष्णु तुला दर्शन देईल. तूं त्याच्या आज्ञेप्रमाणें वाग. त्यांतच तुझं शाश्वत कल्याण आहे."

एवढें बोलून गणपति निघून गेला. त्या क्षणापासून दिवोदासाच्या मनावर एक निराळाच परिणाम घडून आला. त्याला आपलें ऐश्वर्य आणि राजभोग मिथ्या वाटूं लागले. त्यानें श्रीहरीच्या दर्शनाचा ध्यास घतला. तो सोनियाचा दिवस कधीं उगवतो; याची तो वाट पाहूं लागला. त्यानें ब्राह्मणरूपी गणपतीला पुन्हा बोलावणें धाडलें आणि तो आल्यावर उत्कंठेनें विचारलें, कीं 'मला कधीं दर्शन होणार तें निश्चित सांगा.'. गणपतीनें नक्षत्रपट उलगडून थोडा वेळ चिंतन केल्यासारखें दाखवलें आणि म्हटलें,

" राजा, तुझा परम भाग्याचा क्षण अगदीं समीप आला आहे. श्रीहरि येण्याच्या मार्गावर आहे. आत्तां...पुढच्याच क्षणीं...."

आणि एवढ्यांत दिवोदास बसला होता तो राजमहाल एकप्रकारच्या विलक्षण तेजानें भरून गेला. दिवोदासाचे डोळे दिपले आणि मिटले पुन्हां त्यानें जेव्हां डोळे उघडले तेव्हां त्याला समोर शंखचक्रगदाधारी श्रीविष्णु उभा दिसला. त्याच्या श्यामसुंदर कांतीवर पीतांबर झळकत होता. गळ्यांत कौस्तुभमणि आणि कपाळी कस्तुरीचा टिळा शोभत होता. मुद्रेवर प्रसन्न हास्य विलसत होतें.

दिवोदासानें त्याला सिंहासनावर बसवलें आणि षोडशोपचारांनीं पुजून साष्टांग नमस्कार घातला. आपण आज धन्य झालों, कृतकृत्य झालों असें त्याला वाटलें. विष्णूनें मेघगंभीर वाणीनें त्याला म्हटलें,

" राजा ! तुला एक महत्त्वाची गोष्ट सांगण्यासाठीं मी आलों आहें. तूं पृथ्वीचं राज्य उत्तम चालवलंस. तूं स्वतः नीतिन्यायानें वागलास आणि प्रजेतहि सदाचार आणि सद्विचार वाढवलेस. देवेंद्रापेक्षांहि तू घवघवीत यश मिळवलंस. कीर्तिरूपानें अमर झालास. आज मी तुला माझ्या वैकुंठलोकाचं आमंत्रण देण्यासाठीं स्वतः आलों आहें. तूं राज्याचा भार पुत्राच्या शिरावर टाकून पुढच्या तयारीला लाग. पृथ्वीवर रहाण्याची तुझी मुदत संपली."

" कां बरं ? असं कां म्हणतां देवा ? मी अजून समर्थ आहें. माझ्या साऱ्या इंद्रियशक्ती अजून प्रभावशाली आहेत. शिवाय मी प्रजाजनांनाहि नकोसा झालेला नाहीं. जोंवर माझं शरीर आणि मन उत्साहानं काम करूं शकतं, तोंवर प्रजेचं रंजन करणं हें माझं कर्तव्य आहे. "

" होय. तें सगळं खरं. पण एका मोठ्या घटनेची तुला अजून दखल नाहीं. ' या काशीनगरींत माझ्याहून कोणीहि श्रेष्ठ असू कामा नये; तरच मी राज्य करीन ' अशी तूं ब्रह्मदेवाला

घातली होतीस ठाऊक आहे ? "

" होय वैकुंठाधिपति ! मला ठाऊक आहे तें. "

" पण त्यामुळें काय झालं ? काशीचा खरा अधिपति सर्व देवांचा महादेव शंकर याला काशीक्षेत्र सोडावं लागलं. ब्रह्मदेवानें त्याला युक्तीनें मंदराचलावर नेऊन तिथें स्थायिक केलं आणि तुला काशी मोकळी करून दिली. राजा, तूं शिवभक्त आहेस ना ? त्याच्याच कृपेसाठीं तूं पूर्वीं उग्र तप केलंस ना ? मग तो तुझा उपास्य शंकर आज मंदरागिरीवर तळमळतो आहे काशी ही त्याची जिवाआगळी नगरी. तिचा वियोग त्याला असह्य होत आहे. तुझ्या-मुळें त्याला काशी अंतरली आहे. जोंवर तूं आहेस, तोंवर शिवाचा काशींत प्रवेश होणार नाहीं. तोंवर त्याचा आत्मा अस्वस्थ आणि अप्रसन्नच राहील. "

विष्णूचें हें भाषण ऐकून दिवोदासाचें हृदय विदीर्ण झालें. आपल्यामुळें आपल्या आराध्यलिंगाना काशीस मुकावें लागलें, हें समजून त्याचा जीव कष्टी झाला. तो हात जोडून, मस्तक नमवून विष्णूला म्हणाला,

" प्रभो, मी अनंत अपराधी आहे. पण हा अपराध अजाणता घडल्यामुळें मला क्षमा असावी. माझ्यामुळें माझ्या प्रभूला स्थान-भ्रष्ट व्हावं लागलं, ही गोष्ट मला यातना देत आहे. आतां या भूलोकीं रहाणं नाहीं, काशीचा अधिपति काशीत येऊं दे आणि भक्तांचा प्रतिपाळ करूं दे ! दिवोदास आतां आपला अवतार संपवीत आहे. "

श्रीहरीनें ' तथास्तु ' म्हटलें आणि तो अंतर्धान पावला. नंतर त्यानें प्रधान आणि प्रतिष्ठित प्रजाजन यांना बोलावून आणलें आणि त्यांच्या संमतीनें यौवनाश्व या आपल्या पुत्राला राज्यावर बसवलें. मग सर्वांचा निरोप घेऊन तो गंगेवर आला गंगास्नान करून त्यानें शिवाची करुणा भाकली. सर्व मायापाश तोडून टाकले. तो नामस्मरण करीत पुढच्या प्रसंगाची वाट पाहूं लागला. एवढ्यांत

आकाशांत घंटा वाजू लागल्या. सुस्वर गायन ऐकूं येऊं लागलें. पाठोपाठ एक सुंदर विमान खालीं उतरलें. विष्णुदूतांनीं प्रणाम करून त्याला विमानांत बसण्याची विनंती केली. एकवार शिव-नामाचा गजर करून तो विमानांत बसला. असंख्य प्रजाजन तो



BVBK-0400032

दिवोदासाचें वैकुंठीं प्रयाण

प्रसंग पहाण्यासाठीं गंगेवर आले होते. त्यांनीं दुःखाश्रू ढाळीत दिवोदासाचा जयजयकार केला आणि दुसऱ्याच क्षणीं तें वैकुंठीचें विमान अंतराळांत उडून अदृश्य झालें.